# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १२ फाल्गुन शके १९४७, मंगळवार दि.०३ मार्च २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## कारखान्यातील कामगारांची सुरक्षा वाऱ्यावर?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

फटाके आणि स्फोटक उद्योगात कामगार सुरक्षिततेच्या नियमांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. फटाके आणि स्फोटक कारखान्यात कामगार  धोकादायक परिस्थितीत काम करत असतात. अशा कारखान्यात कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर असतो.

स्फोटांमुळे शरीरावर गंभीर जखमाकानाचे/डोळ्यांचे नुकसान आणि विषारी धुरामुळे श्वसनाचे गंभीर आजार होतात. वैयक्तिक संरक्षक उपकरणे वापरणेनियमित प्रशिक्षणआणि अग्निशमन प्रणालीची काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. मात्र प्रामाणिक पणे अंमलबजावणी होत नसल्याने अनेक कामगार सुरक्षिततेच्या अभावी जीवितास मुकत आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात (राऊळगाव) एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक निर्मिती कारखान्यात १ मार्च २०२६ च्या सकाळी भीषण स्फोट होऊन १७ कामगारांचा मृत्यू झाला आणि १८ हून अधिक जण जखमी झाले आहेत हे स्फोट वारंवार होत असून सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत .

याच कंपनीत एप्रिल २०२५ मध्येही स्फोट झाला होतातर सप्टेंबर २०२५ मध्ये सोलर कंपनीतही स्फोट झाला होता. नागपुरात .स्फोटक विभागचे राष्ट्रीय मुख्यालय असूनही वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या घटनेनंतर कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एसबीएल एनर्जी लिमिटेड ही नागपूरमधील एक मोठी औद्योगिक कंपनी असून ती प्रामुख्याने खाणकाम आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी लागणारी स्फोटके तयार करते.

उत्पादने: कंपनीमध्ये स्लरी, इमल्शन, बुल्क स्फोटके, डेटोनेटर आणि डेटोनेटिंग फ्युजची निर्मिती केली जाते.

मालकी: सन २००२ मध्ये 'अमिन एक्सप्लोसिव्हज प्रा. लि.' या नावाने स्थापन झालेल्या या कंपनीचे नियंत्रण २०१६ मध्ये चौधरी कुटुंबाकडे आले. सध्या अलोक चौधरी हे कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. कंपनीचे मुख्यालय नागपूरमध्ये असून तिची नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार करण्यात आली आहे.

या भीषण दुर्घटनेमुळे स्फोटक निर्मिती कारखान्यांमधील कामगार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्फोटक कारखान्यांना परवाने देणे आणि तेथील सुरक्षा मानकांचे निरीक्षण करण्याची जबाबदारी 'पेट्रोलियम अँड एक्सप्लोझिव्हज सेफ्टी ऑर्गनायझेशन'  या संस्थेची आहे. विशेष म्हणजे 'पेसो'चे मुख्यालय नागपूरमध्येच असूनही जिल्ह्यात वारंवार होणारे असे अपघात यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, एसबीएल एनर्जी लिमिटेडमध्ये स्फोट होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी एप्रिल २०२५ मध्येही येथे एक स्फोट झाला होता, ज्यामध्ये दोन महिला कामगार जखमी झाल्या होत्या. मागील दुर्घटनेतून कोणताही धडा न घेतल्याने आजची मोठी जीवितहानी झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

मागील दोन वर्षांत जिल्ह्यातील विविध भागांत स्फोटक कारखान्यांत घडलेल्या स्फोटांची मालिका पाहता, ही घटना नियामक यंत्रणांच्या निष्क्रियतेकडे निर्देश करणारा गंभीर इशारा ठरत आहे. काटोल तालुक्यातील बारूद कंपनीत झालेला स्फोट हा अपघात म्हणून दुर्लक्षित करता येईल का? कारण गेल्या दोन वर्षांत नागपूर जिल्ह्यातील बारूद व स्फोटक कारखान्यांत सातत्याने घडलेल्या स्फोटांनी कामगारांचे जीव घेतले असताना, नियामक यंत्रणा केवळ पंचनामे आणि चौकशीपुरतीच मर्यादित राहिली आहे.

नागपूरमध्येच पेट्रोलियम अँड एक्सप्लोझिव्हज सेफ्टी ऑर्गनायझेशन (पेसो) या देशातील बारूद व स्फोटक उद्योगावर नियंत्रण ठेवणाऱ्या सर्वोच्च नियामक संस्थेचे मुख्यालय असताना, त्याच नागपूर जिल्ह्यात वारंवार बारूद कंपन्यांमध्ये स्फोट घडणे हे अधिकच गंभीर आणि अस्वस्थ करणारे वास्तव आहे. नियमांची अंमलबजावणी, परवाने, साठवण मर्यादा, उत्पादन प्रक्रिया आणि कामगार सुरक्षेवर थेट नियंत्रण ठेवणारी यंत्रणा शहरातच कार्यरत असतानाही गेल्या दोन वर्षांत नागपूर जिल्ह्यातील स्फोटक कारखान्यांत जीवितहानीची मालिका थांबलेली नाही. त्यामुळे 'नियंत्रण यंत्रणा प्रत्यक्षात किती प्रभावी आहे?', 'तपासण्या कागदावरच तर होत नाहीत ना?' आणि 'स्फोट झाल्यावरच जाग येणारी यंत्रणा पुढील दुर्घटना रोखण्यात अपयशी ठरत आहे का?'असे प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होत आहेत.

पेसोचे मुख्यालय जवळ असणे ही सुरक्षिततेची हमी ठरत नसेल, तर देशातील इतर भागांतील स्फोटक कारखान्यांच्या सुरक्षेचे चित्र काय असेल, हा सवाल अधिकच बोचरा ठरतो.

# चौथ्या विश्व मराठी संमेलनाचा शानदार समारोप

## मराठी भाषेत शिकूनच सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश झालो–निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई

ज्योतिर्मय साहित्य

कविवर्य कुसुमाग्रज नगरी, नाशिक – आपली मातृभाषा असलेल्या मराठी भाषेत शिक्षण घेऊनच देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश झालो, असे गौरवोद्गार सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांनी काढले.

कविवर्य कुसुमाग्रज नगरीत गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या चौथ्या विश्व मराठी संमेलनाचा समारोप आज सायंकाळी झाला. त्यावेळी निवृत्त सरन्यायाधीश गवई बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), दिग्दर्शक पद्मश्री डॉ. जब्बार पटेल, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, मराठी भाषा विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, संगीतकार अजय आणि अतुल गोगावले, उपमहापौर विलास शिंदे, तारपा वादक पद्मश्री भिकल्या धिंडा आदी उपस्थित होते.



न्या. गवई म्हणाले, कला, साहित्य जोपासण्यासाठी राजाश्रय आवश्यक आहे.  राज्यातील कला, संस्कृती संतांनी जोपासली. छत्रपती शिवाजी महाराज यांनीही कलाकरांचा सन्मान केला. राजर्षी शाहू महाराज यांच्या काळात कलाकरांना राजाश्रय मिळाला होता. मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी अशा प्रकारची संमेलन महत्वपूर्ण भूमिका निभावतात, असे सांगून त्यांनी पुरस्कार प्राप्त कलाकारांचे कौतुक केले. नाशिकसारख्या ऐतिहासिक नगरीत हे संमेलन होत आहे ही अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

**मराठीच्या विश्व गौरवासाठी शासन कटिबद्ध–सभापती प्रा. राम शिंदे**

विधानपरिषदेचे सभापती प्रा. शिंदे म्हणाले, भाषा ही समाजाला जोडण्याचे काम करते, त्यास मराठी भाषा अपवाद नाही. मराठी भाषेचा विश्व गौरव व्हावा, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या धर्तीवर मराठी भाषा विद्यापीठाच्या जिल्हास्तरावर शाखा सुरू कराव्यात. याबरोबरच डिजिटल प्लॅटफॉर्मवर मराठी भाषेचा प्रचार प्रसार झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**मराठी भाषेचा गौरव करणे प्रत्येकाचे कर्तव्य–विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर**

विधानसभेचे अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले, मराठी भाषेचे संवर्धन आणि गौरव करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने संकल्प करावा. लोकशाही बळकट करण्यासाठी मराठी भाषा महत्वाची भूमिका बजावत असून त्यासाठी मराठी भाषेचा प्रसार होणे आवश्यक आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दूरचित्रित संदेश दाखविण्यात आला. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठी ही रोजगार आणि अर्थार्जनाची भाषा बनविण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करीत आहेत.

**युवा वर्गासाठी मराठी भाषेचा सेवेकरी पुरस्कार–मंत्री डॉ. उदय सामंत**

मराठी भाषा मंत्री डॉ. सामंत यांनी संवाद साधताना सांगितले की, नाशिकवासियांनी विश्व मराठी संमेलन यशस्वी करून दाखविले आहे. विश्व मराठी संमेलन हे फक्त मराठी भाषेसाठी मर्यादित नाही, तर मराठीचे सर्वांग दर्शन आहे. पुढील वर्षीचे संमेलन नागपूर येथे होईल. प्रदर्शनातील स्टॉल वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. स्थानिक कलाकारांनाही या संमेलनात स्थान दिले आहेत. दरवर्षी युवा वर्गाला मराठी भाषेचा सेवेकरी हा पुरस्कार देण्यात येईल. पुढील दोन महिन्यात लंडनला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने जगातील पहिले वैश्विक भाषा केंद्र सुरू करण्यात येईल. पाच लाख रुपयांचा मराठी भाषा सेवेकरी पुरस्कार भाषेचे जतन, संवर्धन करणाऱ्या व्यक्तीना देण्यात येईल.

**सर्व भाषिक शाळांसाठी मराठी भाषा अनिवार्य–शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे**

मंत्री भुसे म्हणाले, मराठी भाषा हा विषय शासनाने सर्व भाषिक शाळांसाठी अनिवार्य केला आहे. त्याची अंमलबजावणी शिक्षण विभाग करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास देशपातळीवरील सर्व शाळांच्या अभ्यासक्रमात शिकविला गेला पाहिजे यासाठी केंद्र सरकारनेही मंजुरी दिली आहे. मराठी भाषेसाठी शासन नेहमीच आग्रही आहे. येत्या वर्षभरात शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून मराठी शाळांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्यात येतील.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस ॲड. ठाकरे यांनी प्रास्ताविक केले.

**विविध पुरस्कारांचे वितरण**

तारपा वादक पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा यांना निवृत्त सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांनी केलेल्या तारपा वादनास उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाट करत दाद दिली. संगीतकार अजय अतुल यांना कलारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पाच लाख रुपये, सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. संचालक डॉ. शामकांत देवरे यांनी आभार मानले.

# इस्त्रायलच्या सिंहगर्जनेचा अन्वयार्थ

ज्योतिर्मय साहित्य

इस्त्रायल आणि अमेरिका या दोघांनी मिळून सुरू केलेल्या संयुक्त लष्करी मोहिमेमुळे इराणची त्रेधा तिरपट उडाली आहे विशेषतः इस्त्रायलच्या प्रगतयुद्धतंत्राचा आणि अचूक नियोजनाचा प्रत्यय या निमित्ताने जगाला पुन्हा एकदा येत आहे आधुनिक काळात बदलत्या युद्धतंत्रामुळे अल्पावधीत लक्ष गाठण्याचे जे तंत्र नव्याने विकसित होत आहे त्याची मीमांसा केल्यास असे दिसते की वेळेचे अचूक नियोजन आणि अद्ययावत सूचना तंत्र यामुळे जेटील मोहिमा सुद्धा फत्ते होऊ शकतात. आणि अपेक्षित उद्दिष्टे साध्य करता येतात हे इस्त्रायलने आपल्या व्यवस्थापनाने पुन्हा एकदा जगासमोर यशस्वी करून दाखविले आहे. अमेरिकेचा महाकाव्य सिद्धांत आणि इजरायलच्या रायझिंग लायन तसेच सिंहगर्जनेचा सिद्धांत यांच्या एकत्र अभिव्यक्तीतून दिसून आलेला चमत्कार म्हणजे इराणने केलेल्या चुकांचे नकारात्मक परिणाम नव्हेत काय असा प्रश्न पडतो. या युद्धातील आरंभीच्या यशापयशाचे आणि जया पराजयाचे विश्लेषण केले असता इजरायलचे पारडे जड असल्याचे दिसते, अगदी हे युद्ध आपण स्वतःच्या ताकदीने सुद्धा लढवू शकलो असतो, असे नेत्यानीहो म्हणतात. परंतु डोनाल्ड ट्रम्प यांच्या महाकाव्य सिद्धांतामुळे त्यांना बळकटी प्राप्त झाली हे विसरता कामा नये. आता इराणमध्ये लोकनियुक्त सरकारची स्थापना हा एक उत्तम पर्याय आहे. युद्धाच्या उत्तरार्धात या पर्यायाच्या दिशेने वाटचाल होत आहे, ही गोष्ट लक्षणीय आहे. राजकीय समाजशास्त्र दृष्टीने पाहता असे दिसते की इराणमधील धुमसता असंतोष आणि लोक हित विरोधात घेतलेल्या निर्णयामुळे तेथील जनता खोमिनी यांच्यापासून दूर जात होती, हे गेल्या तीन महिन्यापासून सातत्याने लक्षात येत होते. त्यामागे खरे कारण म्हणजे इराणमधील आर्थिक प्रश्न सोडविण्यात सरकारला आलेले अपयश हे होते. या दृष्टीने प्रस्तुत लेखात अमेरिका इजरायल यांच्या युद्ध मोहिमेचे नव्याने विश्लेषण केले आहे.



सुरक्षित लक्षावर अचूक मारा, उद्दिष्टांची निश्चिती आणि कृती, तसेच कृतीमधील सुसंगती यामुळे तुर्त तरी यहुदी संस्कृतीचा हा सिंह मोठ्या दक्षतेने गरजेच गर्जना करत आहे असे म्हणता येईल.

कुठल्याही संयुक्त दुहेरी मोहिमेत समन्वय आणि सुसूत्रता या दोन गोष्टी फार महत्त्वाच्या असतात त्याचा प्रत्यय या मोहिमेच्या निमित्ताने दिसून आला आहे.


या युद्धामध्ये इराणचे ७० टक्के पेक्षा अधिक प्रक्षेपण सामर्थ्य नष्ट झाले आहे, असा अमेरिकेचा दावा आहे. त्यामागे अमेरिकेच्या शक्ती स्त्रोतापेक्षाही इजराइलच्या गोपनीय माहिती संकलनाचे खरे यश आहे.

युद्ध संकल्पनांच्या दृष्टीने विचार करता मुख्य नेत्याचे शिरच्छेदन व वस्त्रहरण ही सर्वात मोठी कामगिरी मानली जाते. त्याचाही विचार करता इजरायल उद्दिष्ट पूर्ततेत यशस्वी झाल्याचे म्हणावे लागेल.

युद्धातील नैतिकता ही सापेक्ष असते ज्या तंत्रज्ञानचा इराणने आजवर इजरायलच्या विरोधात उपयोग केला तीच तंत्रे इजराइलने इराणच्या विरुद्धही वापरली आहेत. त्यामुळे जशास तसे या न्यायाने दहशतवादाचा काटा काढण्यात किती यश आले याचे उत्तर भविष्यकाळ देऊ शकतो.

दुहेरी योजनेची आखणी

इस्त्रायल आणि अमेरिका या दोन राष्ट्रांनी मिळून ही संयुक्त मोहीम इराणच्या विरोधात टाकली आहे. हमासने इस्त्रायल वर केलेला हल्ला आणि अमेरिकेची भूमिका डावलून इराणने चालू ठेवलेला अनुप्रकल्प या दोन कारणामुळे दोन्ही देशांनी एकत्र येऊन ही युद्ध मोहीम आखली. जर इराणने अमेरिके सोबतच्या शांतता तह गूण्यागोविंदाने स्वीकारला असता तर हा युद्धप्रसंग उद्भवला नसता. परंतु




इराणची हेकेखोर भूमिका आणि आयातुल्ला खोमिनी यांनी केलेला डोनाल्ड ट्रम्प यांचा अपमान, यामुळे ही परिस्थिती घडली आणि अमेरिकेला इजरायलच्या बाजूने युद्धात उडी घ्यावी लागली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने लोकशाहीच्या रक्षणासाठी युद्धात उडी घेतली होती तशीच परिस्थिती आजही आहे आणि अमेरिकेने इस्त्रायलच्या बाजूने लोकशाहीच्या रक्षणासाठी युद्धामध्ये भाग घेतला आहे.

खरे तर इजराइल एकटा सुद्धा इराणशी लढू शकला असता परंतु त्याच्या भोवती असलेल लेबनॉन सीरिया तसेच इजिप्त इराक इत्यादी देशांचे कडबोळे पाहता अमेरिकेला इजराइलच्या बाजूने युद्धात भाग घेणे अपरिहार्य झाले होते.

प्रतिकात्मक अर्थ काय

इजरायल ने आपल्या लष्करी मोहिमेचे नाव रोरिंग लायन म्हणजे सिंहगर्जना कसे ठेवले हे लक्षात घेण्यासारखे आहे. मुळातच इजरायलच्या लष्कराला गरजता सिंह या प्रतीकाने ओळखले जाते.

आपली लष्करी ताकद दाखविणारी ही मोहीम सुद्धा या देशाने याच नावाने चालविली आहे अमेरिकेने इस्त्रायलच्या मदतीने इराणविरुद्ध चालविलेली ही संयुक्त मोहीम विशेष महत्त्वाची आहे या मोहिमेचे नाव भयंकर महाकाव्य असे दिले आहे त्यामागचा उद्देश इराणचा अनु कार्यक्रम रोखणे हा प्रधान आहे असे करण्यासाठी अमेरिकन लष्कराबरोबरच हवाई दल आणि नौदल यांनी यांचेही सामर्थ्य पणाला लावले आहे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठ्या योजना ही मोहीम आखली आहे आणि कृतीमध्ये आणली आहे.

नियोजन आणि व्यवस्थापन

प्रस्तुत योजनेचे नियोजन आणि व्यवस्थापन या दोन्ही मित्र राष्ट्रांनी अत्यंत आयोजकतेने केले आहे त्यामागील दूरदृष्टी आणि योजना लक्षणीय आहे विशेषतः या मोहिमेस दिवसाढवळ्या प्रारंभ करण्यात आला, त्याचे कारण असे की तहाची आणि चर्चेची फेरी सातत्याने पुढे नेली तरीही इराण आडमुठेपणाची भूमिका घेत आहे. हे पाहून डोनाल्ड ट्रम्प यांनी अचूक वेळ साधली आणि या मोहिमेला प्रारंभ केला. मागील बारा दिवसाच्या युद्धाचा अनुभव गाठीशी होताच, शिवाय इजरायलच्या मोसाद या गुप्तचर संघटनेने इराणच्या लष्करी व्यवस्थेची तसेच खोमिनी त्यांचे म्होरके समर्थक यांची बारीक माहिती संकलित केली होती. मोसादच्या या गुप्तचर यंत्रणेचे समर्पक सामर्थ्य हे सुद्धा अमेरिकेच्या अचूक हल्ल्यासाठी सहाय्यभूत ठरले असल्याचे दिसून येते. आधुनिक युद्धतंत्रातील प्रगत वैज्ञानिक दृष्टिकोन कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा उपयोग क्षेपणास्त्रांचा नेमका मारा आणि हवाई दल व नौदलाची पहिल्या दिवशीच चांगले यश संपादन करणे शक्य झाले.

खोमिनी यांचा शेवट

इराणला मूलतत्त्ववादाच्या वादळात घेऊन जाणारे अया तुला खोमिनी हे या आक्रमण प्रसंगी आपले स्थान वारंवार बदलत होते, शिवाय त्यांची अनेक रूपे एकाच वेळी प्रकट होत असत. पण मोसादने अचूक माहिती मिळविल्यामुळे होमेने यांच्यावर नेमका हल्ला करणे शक्य झाले. प्रारंभी इराणचे प्रवक्ते त्यांच्या हस्तेबाबत कानावर हात ठेवत होते आणि ही बातमी खोटी असल्याचे सांगत होते परंतु अखेर सत्य फार काळ लपले नाही आणि लष्कराच्या प्रवक्त्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याचे मान्य केले. व ४० दिवसाचा दुखवटा जाहीर केला. जिनेव्हा येथे जेव्हा शांततेची बोलणी चालू होती तेव्हा खोमिनी यांनी जारी केलेल्या काही व्हिडिओमध्ये ट्रम्प यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधाने केली होती. तसेच अमेरिकेवर प्रतिहल्ला करण्याची आणि इजरायल व अमेरिका दोघांनाही प्रतिशह देण्याची भाषा केली होती, त्यामुळे चर्चेच्या फेरीदरम्यान वातावरण तापविण्याचे काम खोमणे यांनी केले आणि ट्रम्प यांनी यासंदर्भात थेट प्रत्युत्तर देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे एकीकडे शांततेच्या फेरी आणि दुसरीकडे युद्धाची तयारी असे उभयपक्षी शहप्रतिशयचे राजकारण चालू होते अखेरयुद्धाला तोंड फुटले आणि इजराइलच्या चतुराईमुळे खोमिनी यांचा दुर्दैवी अंत घडून आला. शिवाय इराणचे लष्कर प्रमुख संरक्षण मंत्री यांच्यासह ४० मोहरे पहिल्या टप्प्यात इराणने गमावले आहेत.




## जात्यावरच्या ओव्या......

झाड आंब्याच झाड
योगी बसले सावलीला
जमली लेकर माणस
ऐके संताच्या वाणीला ||५२४||

झाड आंब्याच झाड
जीव लावा लेकरावाणी
नाही जाणार सोडून
पुत्र धरतीचा ऋणी ||५२५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक - भाग ३




ज्योतिर्मय साहित्य

प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ।
सदाचार हा थोर सांडू नये तो ।
जगी तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।

अर्थ : पहाटेच्या वेळी मनात श्रीरामाचे चिंतन करावे. त्यानंतर वाणीने त्याचे नाम उच्चारावे. जगात सदाचाराला अत्यंत महत्त्व आहे; तो कधीही सोडू नये. सदाचाराने वागणारा मनुष्यच खऱ्या अर्थाने धन्य ठरतो.


पहाटेची वेळ किती रम्य आणि शांत असते! आपल्या संस्कृतीत तर या वेळेला ''रामप्रहर'' असे सुंदर नाव आहे. रात्रीच्या विश्रांतीनंतर पहाटे मन स्वच्छ, प्रसन्न आणि स्थिर असते जणू एखाद्या शांत डोहातील निर्मळ पाणी. म्हणूनच दिवसाची सुरुवात भगवंताच्या चिंतनाने करावी, असे समर्थ सांगतात. चिंतन म्हणजे एखाद्या गोष्टीचा विचार.




प्रभाती मनात रामाचे स्मरण केले, त्याचे नाम घेतले, तर त्या नामाचा संस्कार दिवसभर मनावर राहतो. सकाळी ऐकलेले एखादे गाणे जसे दिवसभर ओठांवर रेंगाळते, तसेच पहाटे घेतलेले भगवन्नाम मनात गुंजत राहते. जसे एखादा रुग्ण सकाळी घेतलेल्या औषधामुळे दिवसभर सुदृढ राहतो, तसेच प्रभातीचे नामस्मरण मनाला अंतर्गत बळ देते.


समर्थ पुढे सांगतात ''पुढे वैखरी राम आधी वदावा'' - म्हणजे कोणतेही कार्य सुरू करण्यापूर्वी मुखाने, वाणीने रामनाम उच्चारावे. पूर्वी घराघरांत सकाळी स्तोत्रपठण, भजन, आरती यांची परंपरा होती. आजच्या वेगवान जीवनात ती कमी होत चालली आहे. अनेकदा प्रश्न विचारले जातातयाचा काय उपयोग? परंतु प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर मोजता येत नाही; तरीही ती निरर्थक ठरत नाही.

प्रभातीचे चिंतन मनावर सुसंस्कार घडवते. दिवसाची सुरुवात मोबाईलच्या पडद्याने नव्हे, तर भगवंताच्या नामाने झाली, तर एकाग्रता, सकारात्मकता आणि संयम यांची वाढ होते. वाईट विचारांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती मिळते. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

सतत सन्मार्गाच्या रस्त्यावर चालावे. मान्य आहे असं निःस्वार्थ वागलं तर समाज आपल्याला अगदी वेड्यात काढतात पण त्याकडे लक्ष द्यायचं नाही. आपला सन्मार्गाचा रस्ता हा कितीही ओबडधोबड,खाचखळग्याचा वाटला तरी त्या रस्त्याने जाताना आपल्याला सद्गुणांचा सद्गुरू भेटणार आहे. !!! ते आपलं कौतुक करणार आहेत. सद्गुरूंच्या सहवासात राहिल्याने त्यांची आशीर्वाद रूपी थाप आपल्या पाठीवर पडल्याने

आपण कृतकृत्यं होणार आहोत ही खूणगाठ मनाशी पक्की बांधून सतत श्रवणभक्ति केली पाहिजे. श्रवणभक्तिने आपल्यात आपल्या अंतरंगात बदल होतात. म्हणजेच भगवंत आपल्याला जे फळ देतात ते उधार देत नाहीत. तर रोख रूपात आपल्याला बक्षीस मिळणार आहे. अशी विचार धारणा ठेवावी. **(क्रमशः)**

## नाम हे परमात्मस्वरूपच आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम म्हणजे भगवंताचे नाव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळ्या नावांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे, तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की, भगवंत मुळात जो निर्गुण, निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नाम-रूप लागले; आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले, म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते, त्याप्रमाणे वृत्तीचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे, आणि वृत्तिसुद्धा सूक्ष्म आहे; म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळ्यांचा भावार्थ एकच आहे.

अन्नाला स्वतःची चव असते; त्यात आपण आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत, परंतु सर्वांना शेवटी ' बारीतून ' जाऊनच दर्शन घ्यावे लागते; त्याप्रमाणे, इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे, ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे, आणि ते घेता घेता शेवटी स्वतःला विसरून जावे, हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे.

जसे आपले आपलेपण आपल्या नावात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते; परंतु देहबुद्धी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते, आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे, तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे, की प्राणाबरोबरच ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### दिवस दुसरा

पुढे.......
भाषा आणि शैली या दोन गोष्टीचा विचार आवश्यक असतो.समजुन सांगणारा डॉक्टर आपणास आवडतो.त्या शैलीने आपल्या मनात विश्वास निर्माण होतो .
आपण प्रतिपादन करताना भाषेची रचना कशी शैली हे खूप महत्वाचे आहे.योग्य शब्द, योग्य शैली असेल तर आनंद निर्मिती करता येते.अशी भाषा व शैली कशी असावी हे सांगणारे भागवत आहे.भागवतांची भाषा व शैली किती सुरेख आहे, हे लक्षात घेण्या सारखे आहे.
वेदाचा भाषे बद्दल सायनाचार्यांनी तीन पद्धती सांगितल्या आहेत.
*समाधी भाषा* उस्फुर्त पणे प्रकटणारी भाषा. आधी मनात येते, मग बोलल्या जाते.मनात येणारा संकल्प खूप वेगवान असतो. पण तो झाल्या शिवाय शब्द येत नाहीत. कृती होत नाही.महात्म्याच्या भाषा उस्फुर्त भाषा असते.ही कधी ओळखायची ?आपल्याला ठेच लागली तर आईग व खूप मोठे संकट असेल तर बापरे...ही समाधी भाषा आहे.इथे संकल्प नव्हता.
सायनाच्यार्य म्हणतात ज्या भाषेत दृष्टांत नसतो,अलंकार नसतात.समजून सांगायची अपेक्षा नसते. ती भाषा समाधी भाषा समजावी.
दृष्टांत त्या वेळी दिला जातो, ज्या वेळी बोलणार्याला समोरच्याला हे समजणार नाही असे वाटते तेव्हा तो दिल्या जातो.
2 लौकिक भाषा.यात दृष्टांत दिले जातात. त्यात समोरच्याला समजावे अशी तळमळ असते.
3 पारलौकिक भाषा
सर्वांचे कल्याण व्हावे असे वाटते.
भागवतांची भाषा ही कधी समाधी,कधी लौकिक तर कधी पारलौकिक भाषा आहे.
भागवतांच्या आकृती बंध हा तांत्रिक भाग आता पाहू. क्रमश:............



## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

आजच्या होळीला । करूनी नमन ।
जाळू पापी मन । सारे जण ॥१॥
हे होलिका देवी । आम्हास दे बुद्धी ।
मनाचीच शुद्धी । आज करू ॥२॥
जळून जाऊ दे । गर्व, अहंकार ।
करूया स्वीकार । मांगल्याचा ॥३॥
लाभू दे साऱ्यांना । सुख अन् शांती ।
राहो शुद्ध मती । सकलांची ॥४॥
अर्पितो तुजला । पोळी पुरणाची ।
आम्हास सुखाची । प्राप्ती होवो ॥५॥
माधव हा म्हणे । होलिका मातेस ।
सुख दे सर्वांस । निरंतर ॥६॥




## मिनीवर बसून जेवणाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

पचन सुधारते

जमिनीवर मांडी घालून बसल्याने, अर्धपद्मासनाची स्थिती निर्माण होते. तसेच जमिनीवर ताट असल्याने जेवणाचा घास घेण्यासाठी वाकावे लागते या सतत होणाऱ्या शारीरिक हालचालीमुळे पोटाजवळील स्नायूंना चालना मिळते व पचनाची क्रियादेखील सुधारते.

वजन घटवण्यास मदत होते

जमिनीवर बसून जेवल्याने, वजन कमी होण्यासही मदत होते. वजन वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रमाणापेक्षा अधिक खाणे. जमिनीवर बसून जेवताना 'वेगस नर्व्ह' (पोटाकडून मेंदूला संकेत देणारी) भूक व जेवणाचे प्रमाण योग्यप्रकारे राखू शकते. टेबलापेक्षा जमिनीवर बसून जेवल्याने, जेवणाचा वेग मंदावतो व पोट आणि मेंदूतील समन्वयता सुधारते. परिणामी अतिप्रमाणात खाण्याची वृत्ती कमी होते व वजनही काबूत राहते.

लवचिकता वाढवत

पद्मासनात बसल्याने, पाठीचे, कमरेतील तसेच पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने पचनसंस्थेचा मार्ग सुधारतो. अशा स्थितीत बसल्याने पोटावर ताण येण्याऐवजी जेवण पचण्यास व ग्रहण करण्यास मदतच होते. परिणामी पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने शरीर लवचिक व आरोग्यदायी बनण्यास मदत होते.

मन शांत होते व खाण्यावर लक्ष केंद्रित होते

जमिनीवर बसून जेवल्याने मेंदू शांत होतो व तुमचे सारे लक्ष जेवणाकडेच राहते. मनाची अस्थिरता कमी झाल्याने, जेवणातून मिळणारी पोषणतत्त्वे शरीर अधिक उत्तमप्रकारे ग्रहण करण्यास समर्थ होते.

कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते

दिवसातील किमान एका जेवणाचा आपल्या कुटूंबासोबत जरूर आनंद घ्यावा. दिवसभरातील क्षीण व ताणतणाव हलका होतो. तसेच एकमेकांशी बोलल्याने, काही समस्यांतून मार्ग शोधण्यास मदत होते व नकळत कुटूंबातील सदस्यांशी जवळीक वाढते.

शरीराची स्थिती (पॉश्चर) सुधारते

शरीराची स्थिती उत्तम राखणे हे निरोगी आरोग्याचे गमक आहे.शरीरातील काही स्नायू व सांध्यांवरील अतिरिक्त ताण कमी करून थकवा कमी होण्यासदेखील मदत होते. जमिनीवर बसून जेवताना पाठीचा कणा ताठ राहतो व पोट, खांदा व पाठीच्या स्नायूंची योग्य प्रमाणात हालचाल होते.

दीर्घायुषी बनवते

ही अतिशयोक्ती नाही. जमिनीवर बसून जेवल्याने आयुष्य वाढते. 'युरोपियन जर्नल ऑफ प्रेव्हेंटिव्ह कार्डीयॉलॉजि 'च्या अहवालात प्रसिद्ध केलेल्या अभ्यासानुसार, जमिनीवर मांडी घालून बसलेली व्यक्ती जर कशाचाही आधार न घेता उठली तर त्यांचे आयुष्यमान अधिक आहे, असे समजावे. कारण अशा स्थितीतून उठण्यासाठी शरीराची लवचिकता अधिक असणे गरजेचे आहे. आणि जी व्यक्ती उठू शकत नाही त्यांचा मृत्यू नजीकच्या ६ वर्षात होण्याची शक्यता ६.५ पटीने अधिक असते.

गुडघे व कमरेतील सांधे मजबूत होतात - योगा फॉर हेलिंग या पुस्तकाचे लेखक पी.एस. वेंकटेशवरा यांच्यामते, पद्मासनामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. पचन संस्थेसोबतच सांधेदुखीचा त्रास होत नाही. गुडघा, घोटा व कंबरेतील सांधे लवचिक राहिल्याने अनेक विकार दूर होण्यास मदत होते. जमिनीवर बसल्याने स्नायूंबरोबर सांध्यांची लवचिकतादेखील वाढते. **(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

### उपयुक्तता

दोन मित्र होते. दोघांनाही झाडाफुलांची आवड होती. दोघांनीही एकाच गावात जमीन खरेदी केली. रस्त्याच्या या बाजूला गोविंदाची आणि दुस-या बाजूला गोपाळाची जागा होती. दोघांनी मिळून ठरवले की आपण या जागांमध्ये झाडे लावायची. आपल्या बागेची जगात तारीफ झाली पाहिजे. दोघांनीही जमिनीची मशागत केली आणि मग तिथे झाडे लावली. रस्त्याच्या डाव्या बाजूला गोविंद उद्यान आणि उजव्या बाजूला गोपाळ उद्यान उभे राहिले. गोविंदाने आपल्या जागेत फक्त सुरुची झाडे लावली. उंच-उंच हिरवेगार सरळसोट सुरु वृक्ष वाढले. आभाळाच्या निळाईशी जणू त्या झाडांची टोके खेळत होती. दूरवरून पाहिलं तर शे-पाचशे सुरुच्या झाडांचे उद्यान फारच सुंदर दिसत होतं. रांगेने लावलेल्या झाडांमधून गोविंदाने छोट्या वाटा तयार केल्या होत्या. गोविंद उद्यान बघायला येणारे लोक खुश होऊन जात असत. गोपाळनं आपल्या बागेत निरनिराळी फळझाडं, फुलझाडं लावली होती. चमेली, जास्वंद, मोगरा, गुलाब, झेंडू, तर वड पिंपळ, आंबा, चिंच, बोरं अशी विविध झाडेझुडपे त्यांने आपल्या बागेत लावली होती. त्या बागेतून जातानासुद्धा छान वाटायचे. फुलांचा मंद सुवास तेथे दरवळत असे. एकदा एक परदेशी प्रवाशांचा जथा दोन्ही बागा बघायला तेथे आला. त्यांनी पहिल्यांदा गोविंदउद्यानाला भेट दिली. बाग बघून ते खुश झाले. त्यांनी गोविंदाची स्तुती केली. पण दुपार झाली. सूर्य डोक्यावर आला आणि सुरुच्या झाडाला न फळ न सावली त्यामुळे प्रवाशांना उन्हाचा त्रास होऊ लागला. ते लगेच गोपाळउद्यानात गेले. आंब्याच्या, वडाच्या झाडाखाली त्यांनी विश्रांती घेतली. तिथल्याच काही फळांचा त्यांनी आस्वाद घेतला. चिंचा, आवळे, पेरू, कै-या त्यांनी खाल्या. जाताना त्यांनी अभिप्राय तेथील वहीत लिहून ठेवला. " गोविंद उद्यान केवळ सुंदर आहे पण गोपाळउद्यान हे सुंदर तर आहेच पण उपयुक्तही आहे."
तात्पर्य - निसर्गाने दिलेल्या शक्तिंचा योग्य त्या ठिकाणी उपयोग करता आला पाहिजे. निसर्गाचे धन जर योजकतेने वापरले तर ते उपयुक्त ठरतं.

# उत्सव होळीचा, जल्लोष रंगपंचमीचा...



**ज्योतिर्मय साहित्य**

येणारा काळ परिक्षांचा असला तरी त्या गोष्टीला थोडीफार बगल देऊन का होईना पण साजरा होतोय एक आनंदी उत्सव म्हणजे होळी, धुलीवंदन आणि रंगपंचमीचा.. फाल्गुन शुद्ध पौर्णिमा म्हणजेच होळी पौर्णिमा. होळीच दुसरं नांव म्हणजे हुताशनी पौर्णिमा. होळी हा सण शहरात तसेच खेड्या-पाड्यातून मोठ्या आनंद आणि उत्साहाने साजरा केला जातो. होळी आली की होळीसाठी लाकडं, गवऱ्या गोळा करणारी मुलं गल्ली बोळातून गात सुटतात. ''होळी रे होळी पुरणाची पोळी'' .. किंवा ''होळीला गवऱ्या पाच पाच... डोक्यावर नाच नाच''.


लाकडं गवऱ्या गोळा केली जातात. मग घराच्या अंगणांत किंवा चौकात एक मोठी एरंडाची फांदी उभी करतात. त्याच्या भोवती लाकडं गोवऱ्या रचतात. संध्याकाळ झाली की होळी पेटवतात. सुवासिनी, मुलं, मुली, मोठी माणसं सर्वजण ह्या होळीची पूजा करतात. होळीला पुरण पोळीचा नैवेद्य दाखवतात. जे जुनं आहे, कालबाह्य आहे, अमंगल आहे त्या सर्वांचा जाळून नाश करायचा. नव्याचा चांगल्याचा उदात्ततेचा स्विकार करायचा हाच होळीचा खरा संदेश आहे.

आणि त्यानंतर फाल्गुन कृष्ण पंचमी या तिथीला रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. धुलिवंदनापासून सुरू होणाऱ्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी पाच दिवस पूर्ण होतात. रंग पंचमी म्हणजे रंगांचा सण. या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो. बालचिमुकल्यां पासून बरेचजण रंगपंचमीचा जल्लोष साजरा करत सर्वजण रंगांत न्हाऊन निघतात. परस्परांवर पाणीही उडवले जाते. अशी ही रंगरंगाची सप्तरंगी रंगपंचमीचा जल्लोष अनेकांना नवाआनंद देऊन जातो म्हणूनच हा फाल्गुन महिना सर्वांसाठी उत्सव होळीचा आणि जल्लोष रंगपंचमीचा बनून राहिलाय.

✍️
दिपक पवार, चिंधवली
मो. 75883 82445

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गृह-संवाद अभियानाच्या माध्यमातून हजारो घरातील लाखो लोकांशी संपर्क

## संघ शताब्दीनिमित्त वर्षभर विविध उपक्रमाचे आयोजन



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्ष झाल्या निमित्त देशभर व देशाबाहेर विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याअंतर्गत कर्वे नगर मधील ''गृह - संवाद'' कार्यक्रमानिमित्त कर्वेनगर निवासस्थान असलेल्या

आंतर राष्ट्रीय लॉन टेनिसपटू व २०१८ च्या अर्जुन अॅवॉर्ड विजेत्या अंकिता रैना* यांची पश्चिम क्षेत्र संपर्क प्रमुख कैलास सोनटक्के, कर्वेनगर संघचालक उदयन पाठक, गिरीजा शंकर, नटराज वस्ती सह सयोंजिका संजीवनी महाजन, कर्वेनगर संपर्क प्रमुख अनिल वाघ यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस पटू अंकिता रैना यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लॉन - टेनिस स्पर्धांमध्ये वैयक्तिक आणि सामुहिक यश प्राप्त केले आहे. त्यातील उल्लेखनीय कार्य याप्रमाणे -

टूरमध्ये एक आणि १२५ स्पर्धा (दोन्ही दुहेरीत) सर्किटमध्ये ११ एकेरी आणि ३० दुहेरी जेतेपदे. एप्रिल २०१८ मध्ये, त्यांनी पहिल्यांदाच एकेरी क्रमवारीत टॉप २०० मध्ये प्रवेश केला आणि ही कामगिरी करणारी भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या फक्त पाचव्या खेळाडू ठरल्या. २०१६ च्या दक्षिण आशियाई खेळांमध्ये महिला एकेरी आणि मिश्र दुहेरी स्पर्धांमध्ये सुवर्णपदके २०१८ च्या आशियाई खेळांमध्ये एकेरीमध्ये कांस्यपदक. टूर-स्तरीय जेतेपद जिंकणाऱ्या भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फक्त दोन महिलांपैकी रैना एक आहेत.

ह्या प्रसंगी अंकिता रैना सोबत त्यांचे बंधू अंकुर रैना व मातोश्री उपस्थित होत्या.

कैलासजी सोनटक्के यांनी त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कार्याची, सेवा उपक्रमाची व पंचपरिवर्तना विषयी सविस्तर माहिती दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गृह-संवाद अभियानाच्या माध्यमातून हजारो घरातील लाखो लोकांशी संपर्क साधण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कैलास सोनटक्के यांनी अंकिता रैना हिला ' *पंचपरिवर्तन पुस्तक व त्यांच्या बंधूंना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वर्णिम भारत के दिशा सूत्र* पुस्तके व भारतमातेच्या प्रतिमेचे कार्ड भेट स्वरूपात दिले. रैना कुटुंब पुण्यातील अन्य काश्मिरी कुटुंबे आणि नगर रस्त्यावरील कश्मीर भवनाच्या संपर्कात आहेत.

रैना कुटुंबियांशी पाऊण तासापेक्षा जास्त वेळ संवाद झाला. ''कर्वेनगर येथील गिरिजा शंकर, नटराज वस्तीच्या हिंदू संमेलनाला पुण्यात असल्यास आवर्जून उपस्थित राहीन ''असे अंकिता रैना हिने सांगितले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगरचे संघचालक उदयन पाठक, गिरिजा शंकर, नटराज वस्ती सहसंयोजिका संजीवनी महाजन, कर्वेनगर संपर्क प्रमुख अनिल वाघ हे उपस्थित होते.

मूल मराठी लेखिका - उज्ज्वला केळकर
हिन्दी अनुवादिका - डॉ. मीना श्रीवास्तव

# स्मृति का उत्तरीय

मैं अपने मन के करघेपर बुन रही हूँ, जीवन की स्मृतियों का उत्तरीय, जिसमें आपस में गुँथी हुई जीवन से संलग्न अनेक स्मृतियाँ हैं। चुन चुन कर नाज़ुक, मुलायम, आकर्षक एवं रंगबिरंगे धागे चुने हैं । परन्तु उनके साथ सटे हुए और चिपके हुए कुछ मोटे, खुरदुरे, सख्त और कड़े धागे भी जुड़ गए हैं। कहते हैं, "हम भी इस उत्तरीय में गुंथना चाहते हैं।' अब इस हालत में मैं उन्हें हटा नहीं सकती, उन्हें भी समा लेना है।

काल के द्वार का दरवाजा धकेलकर स्मृतियों की तूफानी लहरें उफनकर तेजी से अंदर घुस रही हैं। मुझे घेरा डाले हुए खड़ी हैं!

"मैं याद हूँ? मैं..... मैं ..... "'

"मैं.. मैं ... और मैं ... मैं ..." एक ही शोर!

गुलाबी रंग की फ्रॉक पहने आठ-नौ साल की एक छोटी बच्ची, चोटियाँ ऊपर कान के पीछे बंधी हुई, उसपर लाल रिबन का एक खूबसूरत सुडौल खिला हुआ फूल। वह ढीठ दृष्ठता से कहती है-

"क्या मुझे भूल गई?"

"ओह, तुम्हें, मेरे बचपन के रूप को कैसे भूल सकती हूँ मैं? वह तो मेरा सबसे प्रिय रूप है!'

"मुझे कहानियां बहुत पसंद थीं। उन्हें सुनना, पढ़ना और बताना, सब कुछ अच्छा लगता था। तब मुझे जादू भरी अद्भुत कहानियां, परियों की और राक्षसों की कहानियाँ बहुत पसंद थीं, साथ ही भूत-प्रेतों और चुड़ैलों की कहानियाँ भी अच्छी लगती थीं।

"जब मैं जादू की कहानियां पढ़ती तो सोचती कि मुझे भी एक जादुई अंगूठी, जादू की एक छड़ी, या फिर अलादीन का जादुई चिराग मिल जाएगा और मैने पहले ही तय कर लिया था कि अगर मुझे ऐसा कुछ मिले तो मैं उससे क्या मांगूंगी। हाँ, ढेर सारी आइसक्रीम, चॉकलेट्स, आसमान जैसी गहरी नीली फ्रॉक, बहुत सारी किताबें और भी न जाने क्या-क्या... एक लंबी फेहरिस्त मेरे दिमाग में तैयार ही थी।"

क्रमश :.........




म्युच्युअल फंड का निवडावे?

भविष्यासाठी बचत करणे ही एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. निसर्गात आपण मुंग्यांसारखे कीटक पावसाळ्यासाठी अन्न गोळा करताना पाहतो, तर मधमाश्या भविष्यासाठी मध तयार करण्यासाठी आणि साठवण्यासाठी फुलांतील रस गोळा करतात.
माझी आई धान्याच्या डब्यात पैसे लपवून ठेवायची. मात्र, केवळ पैसे वाचवणे ही एक जुनी संकल्पना आहे. गुंतवणूक ही एक आधुनिक संकल्पना आहे, ज्याद्वारे आपण आपल्या पैशांचा वापर अधिक पैसे कमावण्यासाठी करू शकतो. या नात्यात आपण मालक आहोत आणि पैसा आपला सेवक आहे.
म्युच्युअल फंड का निवडावे?
गुंतवणुकीसाठी फिक्स्ड डिपॉझिट (FD), रिअल इस्टेट (स्थावर मालमत्ता), शेअर्स (Equity), सोने, चांदी, बॉंड्स, NPS आणि पोस्ट ऑफिसची NSC सारखी अनेक साधने उपलब्ध आहेत. प्रत्येक साधनाचे स्वत:चे काही फायदे आणि तोटे आहेत.
म्युच्युअल फंड युनिट-धारकांचे पैसे कुठे गुंतवतात?
म्युच्युअल फंड वरील सर्व साधनांमध्ये गुंतवणूक करतात. ते शेअर्स, कर्जरोखे (FD सारखी साधने), कमोडिटी आणि रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करतात. गुंतवणूक करताना, ते प्रत्येक मालमत्तेच्या बलस्थानांचा फायदा घेतात आणि त्यांच्यातील त्रुटी कमी करण्याचा प्रयत्न करतात. क्रमश :......




# होळीचा सण लय भारी...

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

आंघोळीच्या पाण्यात पळसाचे फुले टाकून आंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो असे म्हटले आहे.

उत्तर भारत,दक्षिण भारत,महाराष्ट्रात होळीचा सण हा वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, कोकण, या ठिकाणी सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात. कोकणात होळीचा सण जवळपास पंधरा दिवस साजरा केला जातो तर इतर ठिकाणी होळी पौर्णिमा धुलीवंदन म्हणजेच धुळवड नंतर रंगपंचमी शिमगा असा हा सण वेगळ्या पद्धतीने साजरा होतो.

आपल्याकडे आता होळी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन म्हणजे धुळवड असते पण त्याच दिवशी युवा मंडळी धुळवड आणि रंगपंचमी साजरी करतात डी.जे लावून होळीचे गाणे लावून नाचतात एकमेकाला रंग लावतात संपूर्ण रंगाने अंग भिजवून घेतात की चेहरे ओळखू येत नाही अशा प्रकारे आनंद व्यक्त करतात.

उत्तर भारतात पुतना राक्षिणीला जाळतात.

तर दक्षिणेस कामदेवाचे दहन करतात.

कोकणात होळीचा उत्सव मोठा असतो. विशेष रत्नागिरी जिल्ह्यात जास्त.तसेच मालवण. तिकडे शिमगो असेही म्हणतात. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीचा हा मुख्य दिवस असतो . ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याचा मान असतो, व त्यातील निखारा घेऊन मग गावातील ठिकठिकाणी होळी पेटवली जाते. होळी पौर्णिमा, धुळवड, आणि रंगपंचमी असा हा सण साजरा केला जातो. होळी हा रंगांचा सण समजला जातो. तसेच एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली जाते. तसेच पारंपारिक नृत्य पारंपारिक गाणे यामध्ये साजरे केले जातात वंजारी समाजात होळीला फार महत्त्व आहे. पारंपारिक पोषाख घालून नृत्य करण्याची प्रथा आहे.

म.प्र.त इंदोर, वरती मथूरा,वृंदावन, नंदगाव,ला होळी

विशेष साजरी होते. मथुरा आणि वृंदावन येथील होळी व तिथला उत्साह अवर्णनीय असतो, मथुरा येथील फुलांची होळी ही जग प्रसिद्ध आहे. यासाठी गुलाब, कमळ, चंपा, चमेली, यासारखे फुलांची होळी साजरी केली जाते.

प्रत्येक ठिकाणच्या आख्यायिका वेगवेगळ्या सांगितल्या जातात.

महाराष्ट्रात भक्त प्रल्हादाची गोष्ट सांगितली जाते.हिरण्यकश्यपू हे भक्त प्रल्हादाचे वडिल.ते त्याचा फारच छळ करायचे.प्रल्हादाने विष्णुचे/नारायणाचे नाव घेऊ नाही म्हणून त्याला उंच कड्यावरुन लोटले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, पण त्याला काहीही झाले नाही.म्हणून बहिण हुंडा/होलीका जिला अग्निचे भय नसते.तिला वर लाभला असतो, तिच्या मांडीवर अग्नित प्रल्हादाला बसविले जाते,पण प्रल्हादाला काहीच होत नाही.पण हुंडा जळून जाते.अशी कथा आहे.

अर्थातच वाईट गोष्टींचा नाश व्हावा, दुर्गुणाचा नाश व्हावा हीच त्यामागील भावना आहे.

पूर्वीच्या काळी गावातील प्रमुख चौकात नगारखान्यात होळी पेटवली जात होती.आताही गावातील प्रमुख चौका बरोबरीने, निरनिराळ्या कॉलन्यातून होळी पेटवली जाते.एका खड्ड्यात एरंडाची उंच फांदी रोउन आजूबाजूला शेणाच्या गोवऱ्या रचतात. लाकूड, झाडाच्या वाळलेल्या फांद्या




रचतात.हार घालतात.मुख्य होळी पेटवली की तिथून मशाल पेटवून इतर होळी पेटवितात.असा प्रघात आहे.

होळी पेटवलेल्यावर होळीच्या दर्शनासाठी गर्दी होते.स्त्रिया पूजा करतात. पुरण पोळीचा नैवेद्य दाखतात. पुरूषमंडळी नारळ अर्पण करतात. खोबऱ्याची वाटी होळीच्या निखाऱ्यावर भाजून तो प्रसाद वाटतात. सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. होळीला घरोघरी पुरणपोळी,कटाची आमटी,हे समीकरण ठरले असते.

एकमेकांशी वैर,राग असेल तो होळीत टाकून संबंध सुधारावेत ही भावना असते.

होळी सण साजरा करत असताना वृक्षतोड होणार नाही याची दक्षता घ्यावी वृक्षतोड केल्यास दंडात्मक करावे होऊ शकते याचे भान ठेवावे तसेच त्याच्या गल्लीतील लोक स्वच्छने देतील तेवढे गौऱ्या आणि लाकूड होळी जाण्यासाठी घ्यायला हवे उगीच त्यासाठी वादावादी करू नये. सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा हा संघ असल्यामुळे अशा गोष्टी घडायला नको जेणेकरून बंधू भावाने व आनंदाने साजरा होईल.

होळीच्या दुसरे दिवशी धुलीवंदन-धुळवड साजरा करतात. तर पाचव्या दिवशी ''रंगपंचमी '' साजरी करतात. सर्वत्र भेदभाव-भांडणे-वैर-विसरुन रंगाची उधळण करतात. पावरा लोकात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो.बंजारी समाजातही होळी उत्साहाने साजरी होते.

रंगांची उधळण करत असताना तो रंग अपायकारक नसावा, तसेच कोणालाही इच्छा विरूद्ध रंगवू नये. पाणी भरलेल्या फुग्यांचा वापर करू नये शक्यतोवर गुलाल उधळून आनंद व्यक्त करावा पूर्वीच्या काळी




पळसाच्या फुलांचा रंग काढून त्याचा वापर केला जायचा आणि त्यामुळे कुठली हानी होत नव्हती. मद्य प्राशन करू नये. या सर्व गोष्टीचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे.मोठ्या प्रमाणावर भांगही घेत असतात.

होळीचाच भाग रंगपंचमी ला रंग उधळला जातो.राग मानायचा नसतो. म्हणूनच ''बुरा ना मानो होली है''!! म्हणतात.

अनेक ठिकाणी रंग बरसे...भिगी चुनरिया..,रंग बरसे..

होली.. रे होली..रंगोकी होली...,अशा गाण्यावर धुंद होऊन नाच केला जातो.आनंदोत्सव साजरा करतात.

होलिका ही वाईट प्रवृत्तीची असल्यामुळे तिचा अंतही वाईट पद्धतीनेच झाला. त्यामुळेच वाईट आचार विचारांना बाजूला सारणे संपवणे, मनातील वाईट विचार होळी प्रमाणे अग्नीत जाळून राख करणे, हाच होळी साजरा करणे या मागचा उद्देश आहे. याच दिवशी वाईट विचारांचा व वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे. आज आपण बघतोय एकमेकां विषयी वाईट भावना किती टोकाला पोहचल्या आहेत.एकमेकांच्या विषयी चांगल्या भावना नाही, पदोपदी दुष्मनी आढळते, ती नष्ट होणे आजच्या काळात प्रामुख्याने गरज आहे हे सांगायला नकोच. पूर्वीच्या काळी आपल्या देशात सर्व सणवार बंधूभावानी आणि आनंदाने साजरी केली जात होते.आणि त्या सणांचा आनंद घेतला होता. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारे आपल्या पद्धतीने सणवार साजरे करायचे ठरवले असे दिसते. राजकीय स्वरूप आले आहे. दहीहंडी गणेशोत्सव दुर्गा उत्सव यावेळी आपणाला असे वेगळेपण जाणवते.

किमान अशा सणवाराचे प्रसंगी तरी सगळे राग रुसवे बाजूला ठेवून एकत्र यायला हवे.आनंद घ्यायला हवा.

होली के दिन दिल खिल जाते है..
रंगो मे रंग मिल जाते है..
गीले शिकवे भूल के दोस्तों..
दुष्मन भी गले लग जाते है..
असा हा होळीचा सण लय भारी..




ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# आनंदझरा.....

**ज्योतिर्मय साहित्य**

कवि गिरीश जन्मशताब्दी निमित्त (२८ ऑक्टोबर १९९३) वसंतराव कानेटकर यांनी आपल्या वडीलांच्या निवडक कविता या पुस्तकाचे संपादन केले आणि ते प्रकाशित केले. या पुस्तकाला प्रस्तावना पु.ल. देशपांडे यांची आहे. या प्रस्तावनेत पु.ल. म्हणतात कवी गिरीशांना त्यांची मुले दादा म्हणायची. गिरीशांशी माझा ऋणानुबंध विद्यार्थी म्हणून जुळून आला आणि मीही त्यांना दादाच म्हणायला लागलो. वास्तविक ही विद्यार्थिदशा मी आपण होऊन ओढवून घेतली होती. आपण एम.ए. झाल्याशिवाय काही खरे नाही अशी एक इच्छा बी.ए. होऊन काही वर्षे लोटून गेल्यावर माझ्या मनात उड्या मारायला लागली होती. त्या वेळचा माझा सिनेमाचा व्यवसाय सांभाळून एम.ए. च्या टर्म्स भरणे मला शक्य नव्हते, पण सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात दर सहामाहीला ओळीने आठ-दहा लेक्चर्स अशा रीतीने चार सत्रांना हजेरी लावली की, एम.ए.च्या सगळ्या टर्म्स भरल्याची पुण्याई पदरात पडते असे मला कळले. त्याकाळी कवी गिरीश तिथे मराठीचे प्राध्यापक होते. मी त्यांना माझी इच्छा कळवली. त्यांचा आणि माझा त्यापूर्वीपासूनचा परिचय होता. त्यांनी उलट टपाली मला केवळ उत्तरच नाही तर अर्जाचा फॉर्महीे पाठवून दिला. त्या पत्रातले नाऊ ऑर नेव्हर ! हे शब्द मला आजही लक्षात आहेत.

हे मला आठवायचे कारण म्हणजे आजकाल हायस्कूलमध्ये विद्यार्थी मराठी भाषेत इतर अभ्यासाच्या विषयांबरोबर प्रचंड हुशार असतात. विद्यार्थी मराठीत कविता करतात, चांगली भाषणे देतात, हस्तलिखिते करतात, मराठी एकांकिका - नाटकात काम करतात पण दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर आर्थिक स्थैर्यासाठी व प्रगतीसाठी इंजिनीअर, डॉक्टर, चार्टर्ड अकौटंट आणि इतरही ठिकाणी आपले करीअर घडवतात. पण वेळोवेळी हायस्कूल मध्ये मराठीतून केलेल्या कविता, भाषणे आणि इतर त्यांना चैन न पडता पिच्छा पुरवत असतात. ते कविता करतात आणि त्यांना त्या सादर कराव्याशाही वाटतात. साधारण १२ फेब्रु. २०२६ रोजी लोकमंगल हायस्कूल (नागेवाडी - कुशी) या माझ्या शाळेची २००५ साली दहावी पास आऊट झालेली माजी विद्यार्थिनी जिने बी.ई. प्रॉडक्शन एम.ई. मेकॅनिकल (डिसाइन इंजिनिअरींग) केले आहे ती गौरी बोधे हिचा मला फोन आला. ती म्हणाली मी जमदाडे सरांशी बोलले. त्यांनी मला तुम्हाला फोन करण्यास सांगितले आहे. मला माझी कवीता सादर करावयाची आहे. मी म्हटले १४ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रकार भवनाच्या हॉलमध्ये पुण्यात माझे मित्र आणि रंगत-संगत प्रतिष्ठान चे प्रमुख मसापचे कार्यवाह अँड. प्रमोद आडकर यांनी प्रेम कविसंमेलन आयोजित केले असून या कार्यक्रमासाठी कवी संदीप खरे, कवयित्री हेमा लेले आणि कवी आशुतोष जावडेकर उपस्थित राहणार आहेत. मी त्यांना तुला कविता सादर करण्याची संधी द्यावी अशी विनंती करेन. अँड. प्रमोद आडकर यांनी गौरी बोधे या माझ्या शाळेच्या माजी विद्यार्थीनीला कविता सादर करण्याची संधी दिली.



चातकासारखी वाट पाहते मी,
धुंद पावसासारखा एकदाच ये...
नको तो गडगडाट, नको ते वादळ,
अलगद सरीसारखा ये.....

ही १८ ओळींची कवीता आयुष्यात प्रथमच गौरीने पुण्यात सादर केली आणि उपस्थित असलेल्या सर्वांनाच ती आवडली आणि भावली. गौरीचा सत्कार संदीप खरे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रथमच सादर केलेल्या कवीतेला मिळालेला प्रतिसाद बघून गौरी भाराऊन गेली आणि तीच्या कवीता लिखाणास चालना मिळाली. मी तीचे कविता सादरीकरण स्टेटसवर टाकले.

मला याच शाळेच्या २०१७ साली पास आऊट झालेल्या पोर्णिमा साळुंखे (भोसले) या एम.कॉम आणि सेट परीक्षा पास होऊन प्राध्यापक झालेल्या माजी विद्यार्थिनीचा फोन आला. पोर्णिमा ही जरी एम-कॉम झाली असली तरी कॉलेजमध्ये आणि त्यानंतरही कविता लिहिते. तीच्या बऱ्याच कवीता न्यूज पेपरमध्ये मी दिल्या आहेत आणि त्या वाचणा-यांना आवडल्याही आहेत. मी तीला म्हंटले तू पण पुण्यात कविता सादरीकरण करण्यासाठी जरूर ये. वेगवेगळ्या कवीता सादरीकरणाचे आयोजन करणाऱ्यांशी तुझी ओळख करून देतो. तुझ्या कला गुणांना संधी मिळेल.



शिरीश चिटणीस,
सातारा मो. +91 75888 65051

२२ फेब्रुवारीला अचानक व्हॉटसॲपवर मला मेसेज आला कि, तुमच्याशी माझे बोलणे झाले आणि मला कवी व संगीतकार सलील कुलकर्णी यांची ऑनलाइन जाहीरात बघावयास मिळाली. मी जाहीरातीप्रमाणे माझी स्वरचित कविता पुणे येथे सलील कुलकर्णी आयोजित धरोहर या २७ फेब्रुवारीला होणाऱ्या कार्यक्रमासाठी मराठी भाषा गौरव दिन या विषयावर पाठवली होती. पाठवण्याची अंतिम तारीख २० फेब्रुवारी होती. निवड झालेल्या सात कविता इथे या कार्यक्रमात सादर करणार येणार आहेत. जाहिरातीप्रमाणे १५० हून ज्यादा कविता २५ वर्षाच्या आतील कवयित्रींनी पाठविल्या होत्या. २२ फेब्रुवारी रोजी सलील कुलकर्णी यांनी निवड झाल्यानंतर स्वतः निवड झालेल्या कवींच्या नावांचा व्हिडीओ प्रसारित केला. त्यात ते म्हणतात.. प्राजक्ता जाधव, शौनक कुलकर्णी, अबोली जुनागडे, मानसी वैद्य, अथर्व ढगे आणि मृण्मयी जोशी यांच्या कविता 'धरोहर' कार्यक्रमासाठी निवडण्यात आल्या आहेत. सकस कविता आल्या होत्या. निवडताना आमचा कस लागला. या सात कवितांबरोबरच पोर्णिमा साळुंखे, आरोही भामे, स्वाती बोरकर, मधुरा डिग्रजकर, अक्षय जाधव यांच्या कविता वाचूनही खूप आनंद मिळाला. पंचवीस वर्षाखालील इतक्या जणांनी आपल्या स्वरचित कविता पाठवल्या याचा मला आनंद वाटतो. सगळ्या कविता मनापासून लिहिलेल्या होत्या. विषयातील वैविध्य अचंबित करणारे होते.

पोर्णिमा साळुंखेला पुण्यात सादर होणाऱ्या २७ फेब्रुवारीच्या धरोहर या कार्यक्रमात कविता सादर करण्याची संधी मिळणार नाही. पण सलील कुलकर्णी यांनी व्हिडीओमध्ये तीचे नाव घेऊन कौतुक केल्याने पुढील काळात कविता लिहिण्यास आणि सादरीकरणासाठी तीला उत्तेजन मिळाले. हायस्कूलमध्ये कायमच मराठीत कविता करणाऱ्या उत्तम भाषण करणाऱ्या, तसेच विविध कार्यक्रमात हिरीरीने भाग घेणाऱ्या पौर्णिमा साळुंखे तसेच गौरी बोधे आणि इतरही माजी विद्यार्थी त्यांची मराठी विषयाची आवड बी.ए., एम.ए., पीएचडी करून वृद्धींगत करतील याचा मला विश्वास वाटतो. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा जो दर्जा मिळाला आहे त्यासाठी योगदानाचा खारीचा वाटा नक्की उचलतील हे नक्की. पौर्णिमा साळुंखे (भोसले) ने इ-मेलवर सलील कुलकर्णी यांना पाठवलेली कविता अशी आहे...

**माय मराठी ची सये, आज रचते मी ववी**
**स्वर व्यंजनाची तिची, जशी भरली गं वटी**
**रानोमाळ वाऱ्यासंग, गुरढोर ही नाचती**
**पाणी पाटाच मंजुळ, गाणी मराठीची गाती**
**मले समजत नाही, पोट्टे बोलते अंग्रेजी**
**त्याले खेळवे अंगावर, जरी असाले ते सवतीच पोर**
**अशी माझी मराठी ग माय, घावले घावले अंबर**
**तिची सर कुणालाच नाय, सांगा ले गाथा तुकोबा र**

माझ्या आयुष्यात असे प्रसंग आपण निर्माण केलेल्या मराठी शाळांमुळे येतात, तेंव्हा आपल्या मनात निर्माण होणारा आनंदझरा झुळझुळ वाहत राहतो.

***

# होळी अविचारांची की विचारांची

**ज्योतिर्मय साहित्य**

अनेक हिंदूसाठी, होळी हा उत्सव तुटलेले नातेसंबंध पुन्हा स्थापित करण्याचा आणि नूतनीकरण करण्याचा, संघर्ष संपवण्याचा आणि भूतकाळातील साचलेल्या भावनिक अशुद्धतेपासून मुक्त होण्याचा एक प्रसंग आहे . याचा एक धार्मिक उद्देश देखील आहे, जो होलिकाच्या आख्यायिकेद्वारे प्रतिकात्मकपणे दर्शविला आहे. सतत विष्णूचे नाव घेणाऱ्या भक्त प्रल्हादाला अनेकवेळा मारण्याचा प्रयत्न हिरण्यकश्यपूनी केला होता. त्याच्या शिवाय कुणाचे ही नाव घ्यायचे नाही असे फर्मानच त्यानी काढले होते. भक्त प्रल्हाद त्याचा मुलगा असूनही विष्णुचे नाव घेतो म्हणून हिरण्यकश्यपूने आपल्या बहिणीला म्हणजेच होलिकेला प्रल्हादाला मारण्यास सांगितले, होलिकेला अग्नीवर विजय प्राप्त करू शकेल असे वरदान मिळाले होते. होलिका प्रल्हादाला मांडीवर बसवून अग्नीमध्ये प्रवेश करती झाली परंतु विष्णू कृपेमुळे प्रल्हादाला काहीच झाले नाही पण होलिकेची राख रांगोळी झाली. वाईटावर चांगल्याचा विजय हीच संकल्पना होळी साजरी करतानाची असते. आणि तसा संदेशही हा सण देऊन जातो. अर्थातच अविचाराची होळी या निमित्याने होत असते.

दृष्ट प्रवृत्ती, वाईट, अमंगल विचार यांचा नाश करुन चांगली वृत्ती, चांगले विचार अंगी बाळगावे, हा या सणामागील उद्देश.

हा सण आपल्या आयुष्यातील नकारात्मकता दूर करून प्रेमाच्या रंगात न्हाऊन निघण्याचा आणि आनंदाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. परंतु प्राचीन सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या या भारत देशात पाश्चिमात्य संस्कृतीचे




डोळेझाक अनुकरण होत आहे. नीतिमत्ता, माणूसकी आता इतिहास जमा होणार काय अशी शंका येते.

एकीकडे देश प्रगतीपथावर जात आहे तर दुसरीकडे संस्कृतीची अवहेलना होत आहे. प्रत्येक जण दुसऱ्याकडे संशयाने पाहात आहे, तर समोरच्यावर कुरघोडी करू पहात आहे. आपलेपणा, नातेसंबंध ह्या गोष्टींचा विसर पडत चालला आहे. खून मारामाऱ्या नित्याच्याच झाल्या आहेत. देशातला कोणताही प्रदेश पूर्णतः शांत नाही. हे सर्व होत आहे ते आपल्या अविचारी कृतीमुळे, प्रत्येक गोष्ट अपल्याला मिळालीच पाहिजे त्यासाठी मी काहीही करिन, हीच प्रवृत्ती आज घातक ठरत आहे. आणि अश्या सर्व विचार आणि प्रवृत्तीचे दहन आजच्या दिवशी अपेक्षित आहे.

बागवान असो की डॉक्टर असो आपल्या ग्राहकाला कसं लुटता येइल किंवा फसवता येइल हेच पाहत असतात.


फळांना इंजेक्शन देऊन फळात कृत्रिम रंग, गोडवा आणल्या जातो जेकी खाणाऱ्याच्या आरोग्यावर परिणाम करते.


त्यांच्या या अविवेकी कृतिमुळे अनेकांच्या जीवावर ही बेतते. काही डॉ. ही गरज नसताना ऑपरेशन, एक्स रे, सोनोग्राफी आदी टेस्ट, रुग्णाला भीती दाखवून त्यांना खर्चात पाडतात, शरीराची चिरफाड करतात. अशा अविवेकी कृतीचे दहन करणे आज गरजेचे आहे.


तसेच कमी अधिक प्रकारचा पोशाख करून लोकांचे चित्त आकर्षित करणे, त्यांना त्यांच्या कामापासून, ध्येया पासून दूर करणे अशा विकृत पोशाख वृत्तीची होळी झाली पाहिजे तरच निकोप समाज घडेल. यात शंका नाही.


नियमांची पायमल्ली करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. विशेष म्हणजे तरुण वर्ग जो कोणताही नियम धाब्यावर बसवण्यात धन्य समजतो. जिथे नियम पाळून प्रशासनाला मदत करायची ते सोडून नियम तोडला याची शेखी मिरवत गावभर फिरायचे अश्या विचारांची होळी केली पाहिजे. कायद्याचे रक्षकच जेव्हा छोटे छोटे नियम तोडतात तेव्हा मन विषन्न होते मग ते सिग्नल तोडणे असो, राँग साईड असो किंवा व्यवसायाचा दांभिक अविर्भाव असो अशा मानसिकतेची होळी आजच्यादिनी करणे गरजेचे आहे. आजच्या या शुभदिनी अविचारांची होळी करून जगा आणि जगू द्या या उदात्त विचाराची कास आपण धरूया.


✍ बी. सुधीर
=======================
छ. संभाजीनगर 9922438435







हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# मुत्रविकारासंबंधी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे –** वाढत्या वयात मुत्रविकार टाळण्यासाठी पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन करणे, संतुलित आहार ठेवणे तसेच निर्व्यसनी राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मुत्ररोग तज्ञ डॉ. मयूर नारखेडे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित '' ज्येष्ठांमधील मुत्रविकार '' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सायंकाळी हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या नामफलकाचे अनावरण भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा संजय भिसे आणि डॉ. मयूर नारखेडे यांच्याहस्ते करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सखाराम ढाकणे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. कै. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी रविंद्र संदानशिवे, अनिल कुलकर्णी , सुभाष विधाते, सुहास पाटोळे, नीता गुप्ता, रेखा येळंमकर यांनी हिंदी, मराठी गाणी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भामिनी महाले निर्मला कासार, आणि शोभा राजगुरे यांनी केले तर उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलिप चौगुले, अनिलकुमार शाह, विवेकानंद लिगाडे, अनिल कुलकर्णी, रमेश चांडगे, अशोक कलाल, विमल मोंढेकर या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# राज्यस्तरीय मराठी अभिवाचन स्पर्धेत ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूलला द्वितीय क्रमांक

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – मराठी भाषा दिनानिमित्त मोरया शिक्षण संस्था आयोजित माटे प्रशाला, चिंचवड येथे झालेल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेत सुमारे २५० स्पर्धक सहभागी झाले होते.

शिक्षक सांघिक गटात ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल ला द्वितीय क्रमांक मिळाला. सौ. मानसी सोनपेठकर, सौ. मंजुषा गारखेडकर व सौ. जास्वंदी शेवाळे यांनी 'आचार्यदेवो भव' या स्वरचित नाटकाचे प्रभावी अभिवाचन सादर केले.



प्रसिद्ध दिग्दर्शक किरण यज्ञोपवित यांच्या हस्ते विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका व झील एज्युकेशन सोसायटी चे संस्थापक यांनी विजेत्या शिक्षिकांचे अभिनंदन केले.




# महिला-मुलीसाठी मोफत रंगपंचमीला प्रचंड प्रतिसाद !!

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महिला व मुलींसाठी कुलस्वामिनी प्रतिष्ठानतर्फे रंगपंचमी चे आयोजन सौ अलका व विलास कोरडे यांनी केले होते. प्रतिष्ठानचे या उपक्रमाचे हे दहावे वर्ष असुन कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे मोफत महिला व मुलीसाठी कोरड्या रंगाने रंगपंचमीची लॉन वर धमाल मस्ती आयोजित केली होती.

जवळपास २५० महिला व लहान मुलीनी उपस्थित राहुन संस्कृती जपुन रंगपंचमीचा भरपुर आनंद घेतला. सर्वासाठी फोटो काढण्यासाठी ४-५ सेल्फी पॉईंट ठेवले होते,मराठी-हिंदी गाण्यावर धमाल नृत्य व मोफत रंग खेळण्यात आला. कार्यक्रमाचे प्रोजेक्ट डायरेक्टर अविराज कोरडे यांनी काम पाहिले.

नवनिर्वाचित नगरसेविका अदवंत माधुरी ताई, मीनाताई खरात तसेच रमा नावंदर, दिव्या पाटील, छाया खाजेकर, लक्ष्मी गायकवाड, कुलकर्णी कविता, सारिका खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रम यशस्वी करण्यासाठी अच्युत कुलकर्णी, चंद्रमुनी जायभाय, प्रल्हाद गायकवाड, राहुल नावकर यांनी मेहनत घेतली. सर्वांना होळी, रंगपंचमीच्या शुभेच्छा व आभार विलास कोरडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता थंडाई दूध देऊन करण्यात आली.

# प्रकाश भोंगाळे यांचा राज्यस्तरीय साहित्य संमेलनात पुरस्काराने सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

फलटण : मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून २७ फेब्रुवारी रोजी फलटण येथील नवलबाई मंगल कार्यालय येथे ॲग्रो न्यूज परिवार तर्फे ९ वे धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. साहित्य संमेलनाला श्री शनेश्वर संस्थान सोळशीचे मठाधिपती नंदगिरी महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच ज्येष्ठ साहित्यिक श्री जगन्नाथ शिंदे हे उपस्थित होते. यावेळी अजिंक्य योद्धा धर्मवीर संभाजी महाराज या विषयावर निबंध लिहून खुल्यागटात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल श्री प्रकाश शिवाजी भोंगाळे यांचा परिवारासह साहित्य संमेलन अध्यक्ष श्री विजय काकडे यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला ज्येष्ठ पत्रकार श्री अरविंदजी मेहता माझे कविताचे गाव जकातवाडीचे संकल्पनाकार श्री प्रल्हाद पार्टे निवृत्त उप पोलिस निरीक्षक श्री गुंजवटे साहेब संमेलनाचे आयोजक श्री प्रकाश सस्ते यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल सर्वांनी श्री प्रकाश भोंगाळे यांचे सर्वांनी अभिनंदन केले.




# कोकणचा शिमगा... काळजातली ओढ

कोंकणात होळीला शिमगा म्हणतात. फाल्गुन पंचमीपासून अनेक ठिकाणी या उत्सवाला सुरुवात होते. चाकरमान्यांचे 'गावी येणे' सिंधुदुर्गातील शिमग्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. ''गणपती आणि शिमग्याला गावाला यायलाच पाहिजे,'' अशी कोकणी माणसाची भावना असते. मला ओढ लावते ती देवगड तालुक्यातील एका छोट्याशा गावातील माझ्या आजोळची होळी. अगदी लहानपणापासून आईच्या सोबत मी आजीकडे होळी उत्सवाला जायची. या होळी उत्सवाची सांगता पाडव्याच्या दिवशी रात्री मांडावर देवाचे वारे येऊन व्हायची. फाल्गुन पौर्णिमेची रात्र... आकाशात पूर्ण चंद्र आणि खाली गावच्या मांडावर एक वेगळाच माहोल! ढोल आणि घुमटांची ती जुगलबंदी.. तो धीरगंभीर आवाज... आणि हवेत गुलालाचा एक मंद सुवास ! सर्वांच्या नजरा खिळलेल्या असतात त्या समोरच्या अंधारात नाचणाऱ्या एका लखलखत्या ज्योतीकडे. ती केवळ मशाल नसते तर तो असतो आमच्या गावचा राजा. श्री देव कालभैरव, जो आपल्या भक्तांच्या हाकेला प्रतिसाद म्हणून मांडावर अवतरलेला असतो... तो आता मांडावरचा देव असतो.

लहानपणी शिमगा जवळ आला की, मनात भक्तीपेक्षा भीतीच जास्त दाटायची. ढोलाचा तो धडधड वाढवणारा आवाज आणि रात्रीच्या अंधारात मांडावर हातात पेटती मशाल घेऊन बेफाम धावणारा तो 'अवसर' पाहिला की, आईच्या पदरामागे लपावसं वाटायचं. डोळे घट्ट मिटलेले असूनही तो 'देव' गावच्या सीमेपर्यंत ज्या वेगाने धावायचा, ते पाहून अंगावर शहारे यायचे. पण जसजशी वर्षं सरली, तसं लक्षात आलं की, ती भीती नसून एक अनामिक 'दरारा' होता आणि ती मशाल म्हणजे गावाला सुरक्षित ठेवणारा एक दैवी प्रकाश होता. आज मागे वळून पाहताना जाणवतं की, काही गोष्टी विज्ञानाच्या पलीकडच्या असतात, त्या फक्त अनुभवयाच्या असतात. देवगडच्या या माझ्या गावात जेव्हा कालभैरवाचे वारे मांडावर येते, तेव्हा तर्क-वितर्क आपोआप



गळून पडतात. होळी या सणापासून मांड उभारायला सुरुवात होते. मांड म्हणजे दारात मांडव उभारला जातो. रात्र झाली की तिथे होळीनिमित्त वेगवेगळी सोंगे आणली जातात. भजन, कीर्तन, देवाची गाणी घुमट वाजवून मोठ्या जोशात साजरी केली जातात.

**विभा मसुरकर**

गोव्यातील नायकिणीचा नाच, स्थानिक लोकांची कला असे वेगवेगळे कार्यक्रम होळी ते पाडवा चालू असतात.

हा मांड तेथील स्थानिक देवाची आराधना म्हणून बसवला जातो.पाडव्याला रात्री देव मांडावर येतो आणि भक्तांचे गाऱ्हाणे ऐकून त्यांची संकटातून मुक्तता करतो अशी श्रद्धा आहे.अशा वेळी लळीत आणि त्यातील नायकिणीचे नृत्य याला खूप मोठे आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व आहे.

'नायकीण' स्त्रीला सन्मानाने पाचारण केले जाते. तिला पाहुणचार आणि मानाचा विडा दिला जातो. तिच्या कलेचा आणि परंपरेचा सन्मान करण्याचे ते प्रतीक आहे. असे मानले जाते की, नायकिणीने मांडावर नाचणे म्हणजे प्रत्यक्ष 'लक्ष्मी' किंवा 'शक्ती' रूपाने देवाची सेवा करणे होय.

नायकिणीचे नृत्य हे आनंदाचे आणि मांगल्याचे प्रतीक मानले जाते. या नृत्यात खूप साधेपणा असतो, पण त्यातील लय महत्त्वाची असते. अलीकडच्या काळात नायकिणीला आमंत्रित करणे ही प्रथा काही गावात मागे पडत चालली आहे. अनेक ठिकाणी आता व्यावसायिक कलाकार ही भूमिका निभावतात, तरीही त्यामागील 'ग्रामदैवताची सेवा' ही भावना आजही तशीच आहे.

कोकणचा शिमगा म्हणजे केवळ रंगांचा उत्सव नव्हे, तर तो आहे ग्रामदैवताशी असलेल्या अतूट नात्याचा सोहळा. मांडावर ढोलाचा आणि घुमटांचा ठेका जसा जसा वाढत जातो, तसा वातावरणातला उत्साह शिगेला पोहोचतो. ग्रामस्थांमधीलच देवाने कौल दिलेली एक विशिष्ट व्यक्ती जोरजोरात घुमू लागते..त्याला देव अंगात येणे असे म्हणतात. 'ऐसा गोविंदा येतो मजवरी गुलाल उधळितो' या गाण्याच्या सुरांवर जेव्हा गुलालाची उधळण होते, तेव्हा प्रत्येक गावकऱ्याला खात्री पटते की, आपला 'रक्षणकर्ता' आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

अंधाऱ्या रात्रीत जेव्हा मांडावरचा देव हातात पेटती मशाल घेऊन बेफाम धावू लागतो, तेव्हा मनातील भीती जळून खाक होते. सर्वात विस्मयकारक गोष्ट म्हणजे, डोळे बंद असूनही तो 'अवसर' बरोबर गावच्या सीमेपर्यंतच धावत जातो. जणू काही तो 'मांडावरचा देव' स्वतः धावत जाऊन गावच्या सीमा सुरक्षित करत असतो. ''ह्या रेघेच्या आत माझ्या लेकरांना कोणतीही बाधा येणार नाही,'' याचीच ती जणू ग्वाही असते.

या सोहळ्यात केवळ भक्तीच नाही, तर एक अदृश्य 'आधार' असतो. मांडावर उभ्या असलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यांत एक वेगळीच आर्तता असते. कोणाला पोरीच्या लग्नाची काळजी असते, कोणाला संततीचे साकडे घालायचे असते, तर कोणाला हक्काच्या जमिनीच्या वादातून सुटका हवी असते. जेव्हा तो मांडावरचा देव त्या गावकऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो आणि उजवा 'कौल' देतो, तेव्हा मिळणारे समाधान कोणत्याही विज्ञानात बसणारे नसते.

हे चमत्कार आहेत की केवळ योगायोग, हे सांगणे कठीण आहे. पण देवाने दिलेल्या त्या एका 'होकारा'वर अनेकांची लग्न जमली आहेत आणि जमिनीचे पिढ्यानपिढ्या चाललेले तंटे शांत झाले आहेत, हे सत्य नाकारता येत नाही. कदाचित, जेव्हा माणूस सर्व बाजूंनी हरतो, तेव्हा देवाने दिलेला तो शब्द त्याच्यात जी सकारात्मकता निर्माण करतो, तीच कठीण प्रसंगांवर मात करण्याची शक्ती देते. सण संपतो, पण कालभैरवाचा तो 'होकार' वर्षभर प्रत्येक गावकऱ्याच्या मनात उमेद जागवून ठेवतो. तो चमत्कार असो वा नसो, पण त्या निमित्ताने गावात जो एकोपा टिकून आहे आणि माणसाला जो आधार मिळतोय, तेच कालभैरवाचे खरे जागृत रूप आहे.

इथे मी कुठेही अंध श्रद्धेला खतपाणी घालत नाही किंवा जे घडले ते त्या देवाने घडवले असे पुष्टी देणारे विधानही करीत नाही. जेव्हा एखाद्या हताश माणसाला देवासमोर उभं राहिल्यावर जगण्याची नवी उमेद मिळते, तेव्हा ते कोणत्याही प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नाही.

तो श्रद्धेचा विजय असतो. श्रद्धा की अंधश्रद्धा या वादात न पडता या उत्सवांच्या निमित्ताने जो उत्साह आणि देवावरील विश्वास गावकऱ्यांमध्ये दिसून येतो तो नक्कीच मनाला उभारी देणारा असतो हे मात्र खरे.




आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. देशात अनेक जातीधर्माचे लोक आणि तेवढेच अनेक सणवार देखील. प्रत्येक सण इथे आनंदाने साजरा केल्या जातो. त्यातही होळी हा सण लहान्यांपासून ते वृद्धांपर्यंत, स्त्री पुरुष एकत्र येऊन साजरा करतात. खरं तर हा सण निव्वळ मनुष्यच नाही तर निसर्ग देखील साजरा करीत असतो.

**सौ. संगीता श्रीराम मडावी-चौहान,**
साकोली, जि. गोंदिया

फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला साजरा केला जाणारा सण. जणू संपूर्ण सृष्टीच या सणासाठी तयार होत असते. वसंत ऋतुचा आगमन, झाडांची जुनी पाने गळून नवीन फुटलेली पालवी, आंब्याच्या झाडांना आलेला मोहोर आणि रंग खेळायला पळसाच्या झाडाला आलेली फुले. जणू सारा आसमंत या सणाच्या तयारीला लागलेला असतो.

खरं तर हा सण म्हणजे प्रेमाचा, एकोप्याचा आणि बंधुत्वाचा. मनातील वैर विसरून एकजुटीने पुढे जाण्याचा. होळी जळतांनी निव्वळ त्यात गोवऱ्या आणि लाकडेच नाही, तर त्यात मनुष्याला आपल्यातील क्रोध, लोभ, मोह आणि दुर्गुणांनाही जाळावे लागते. सर्व वैर विसरून, गुलाल लावून आणि गाट्यासारखे प्रेमाने एका माळेत राहण्याचे वचन देखील दिले जाते.

एकंदरीतच प्रत्येक सण हा मनुष्याला कुठला ना कुठला त्याच्या हिताचा संदेश देत असतो. परंतु दुःख याचे वाटते की मनुष्याला ते समजत असून देखील तो स्वीकारत नाही. ज्या होळीत आम्ही आपल्यातील दुर्गुण जाळून टाकायला पाहिजे, ते न करता आम्ही रात्रभर जुगार खेळत बसतो. का बरं! रात्रभर जागून - बसून गाव विकासाच्या चर्चा केल्या जात नाही? होळीला दुर्गुण अर्पण केले जात नाही, तर उलट होळी सणाच्या नावाने मनुष्यात ते दुप्पटीने वाढत असतात. मास विक्री दुकानासमोर असलेली भन्नाट गर्दी, अनलिमिटेड दारू पिणे, तोंड भरून दिली जाणारी शिवीगाळ, कारण होळी आहे ना! मग ही होळीची पूजा अर्चना कशाला करायची. दुर्गुण तर नष्ट होणार नाही. मग लाकडे जाळण्यापेक्षा एखादं झाड लावून पुजा करा की! होळी सणाने कुटूंबातील इतर लोक आनंद घेत नसतील, तर हा सण साजरा कशाला करायचा. होळीच्या सणामुळे मनुष्यातील दुर्गुण जळून नाश होईल का? माहिती नाही, पण लाकडे जाळून निसर्गाचा ऱ्हास होतो एवढे मात्र नक्कीच.

# विस्मयकारी खगोलीय नाट्य...... ग्रहण

ज्योतिर्मय साहित्य

आकाशाकडे पाहताना माणूस स्वतःला शोधतो

तमसो मा ज्योतिर्गमय – अंधारातून प्रकाशाकडे जाणे. अशी प्रार्थना मानवाने हजारो वर्षांपूर्वी केली. कारण अंधाराची भीती ही केवळ रात्रीची नसते; ती अज्ञानाची असते. आणि प्रकाश म्हणजे केवळ सूर्याचे तेज नसते; तो ज्ञानाचा दीप असतो.

रात्रीच्या शांततेत जेव्हा आकाश निळ्याभोर कॅनव्हाससारखे उघडते, तेव्हा तारकांची अक्षरमाला जणू विश्वाचा इतिहास सांगू लागते. चंद्र रुपेरी काव्य लिहीत पृथ्वीच्या अंगणात उतरतो. शेतकऱ्याच्या शिवारात, कवीच्या ओळींमध्ये, प्रेमिकांच्या स्वप्नांत आणि प्रवाशाच्या वाटेत चंद्र सदैव सोबत असतो.

परंतु कधी तरी या चंद्राच्या सौंदर्यावर सावली पडते. मंदावतो. तो लालसर होतो. आणि मानव थबकतो ही घटना म्हणजे ग्रहण.

३ मार्च २०२६ रोजी घडणारे चंद्रग्रहण केवळ खगोलीय घटना नाही. ती मानवाच्या भीतीपासून विज्ञानापर्यंतच्या प्रवासाची कथा आहे. श्रद्धा आणि संशोधन यांचा संवाद आहे. अंधश्रद्धेच्या सावलीतून विवेकाच्या प्रकाशाकडे चालण्याचा संदेश आहे.

ज्ञानदीप लागला की अंधार स्वतःहून निघून जातो. ''ग्रहण म्हणजे काय? – सावलीचे विज्ञान आणि विश्वाचे गणित.

ग्रहण म्हणजे एखाद्या खगोलीय वस्तूवर दुसऱ्या वस्तूची सावली पडणे.

सूर्य हा प्रकाशाचा केंद्रबिंदू आहे. पृथ्वी आणि चंद्र त्यांच्या निश्चित कक्षेत भ्रमण करतात. गुरुत्वाकर्षण, वेग, अंतर आणि कोन यांच्या अचूक संयोगातून काही वेळा अशी स्थिती निर्माण होते की प्रकाशाचा मार्ग अडवला जातो.

त्या क्षणी निर्माण होते ग्रहण.

जगातील सर्वात मोठे सत्य म्हणजे निसर्ग गणिताने चालतो.

''ऋतं च सत्यं च अभिधात् तपसोऽध्यजायत''

विश्व नियमांनी निर्माण झाले आहे. ग्रहण हे त्या नियमांचे जिवंत उदाहरण आहे. ग्रहणाचे दोन प्रकार

१. चंद्रग्रहण २. सूर्यग्रहण

दोन्ही घटनांमध्ये सावलीचा खेळ असतो; पण परिणाम वेगळे.

चंद्रग्रहण – पृथ्वीचे सावलीतील आलिंगन.

पौर्णिमेला चंद्र ग्रहण होते. जेव्हा पृथ्वी सूर्य आणि चंद्र यांच्या मध्ये येते, तेव्हा पृथ्वीची सावली चंद्रावर पडते.

सूर्य एका बाजूला. पृथ्वी मधोमध. चंद्र दुसऱ्या बाजूला. सूर्याचा प्रकाश अडवते. सावली चंद्रावर पडते. ती सावली दोन प्रकारची असते –

उपछाया – हलकी सावली, गाढ छाया – पूर्ण अंधार

चंद्र पूर्ण गाढ सावलीत गेला की खग्रास चंद्रग्रहण होते. परंतु चंद्र पूर्ण काळा होत नाही. तो लालसर होतो. जणू पृथ्वीने त्याला सिंदूर लावला आहे.

पृथ्वीच्या वातावरणातून वाकून जाणारे लाल किरण चंद्रावर पडतात.

प्रत्येक सूर्योदय आणि



सूर्यास्ताचा रंग जणू चंद्रावर एकत्र जमा होतो. कवीम्हणतो –

''रक्तिम झाला चंद्र आज,
पृथ्वीच्या प्रेमाचा स्पर्श जणू.''

सूर्यग्रहण – दिवसातील गूढ अंधार

अमावस्येला सूर्यग्रहण होते. सूर्यग्रहण जेव्हा चंद्र पृथ्वी आणि सूर्य यांच्या मध्ये काही वेळ झाकला जातो. दिवसात अचानक अंधार पडतो.

पूर्वी हा अनुभव भयावह होता.

पक्षी घरट्यात परतत, जनावरे गोंधळत, लोक देवाला साकडे घालत.

आज विज्ञान सांगते – हे विश्वाचे सुंदर गणित आहे.

''भीती अज्ञानातून जन्मते; ज्ञानाने ती विरघळते.''

३ मार्च २०२६ चे चंद्रग्रहण वेळ आणि अनुभव

३ मार्च २०२६ रोजी संध्याकाळच्या वेळेत खग्रास चंद्रग्रहण दिसणार आहे.

प्रमुख वेळा : उपछाया प्रारंभ – दुपारी २:१४ खंडग्रास – ३:२० खग्रास प्रारंभ – ४:३४

मध्य अवस्था – ५:०४ खग्रास समाप्त – ५:३३

खंडग्रास समाप्त – ६:४७ समाप्त – ७:५३

सूर्यास्ताच्या सुमारास लालसर चंद्र आकाशात दिसेल. तो क्षण म्हणजे जणू विश्वाने रंगवलेले चित्र.भारतीय पौराणिक कथा – कल्पनाशक्तीचे आकाश मानवाने विज्ञानापूर्वी कथा निर्माण केल्या.

समुद्रमंथनाच्या कथेत स्वर्भानू नावाचा दैत्य देवांच्या रांगेत बसून अमृत पितो. सूर्य आणि चंद्र त्याला ओळखतात. भगवान विष्णू त्याचे मस्तक छाटतात. तो राहू आणि केतू बनतो.

सूर्य-चंद्राचा बदला घेण्यासाठी तो त्यांना गिळतो.

या कथा म्हणजे विज्ञान नाही.

पण ती मानवाच्या निरीक्षणातून जन्मलेली कल्पना आहे. कथांमुळे समाजाने घटना लक्षात ठेवली.

जगातील कथा – मानवाची समान भीती

चीन मधील लोकांची भावना अशी की ड्रॅगन चंद्र गिळतो अशी श्रद्धा. त्यावेळी लोक ढोल वाजवत.

उत्तर युरोपमध्ये लांडगे सूर्य-चंद्राचा पाठलाग करतात.

आफ्रिका मध्ये सूर्य-चंद्र भांडतात आणि ग्रहण म्हणजे समेट.

भिन्न संस्कृती – पण भावना एकच. अज्ञानाची भीती, वाढलेली अंधश्रद्धा.

भारतात ग्रहणाशी अनेक समजुती जोडल्या गेल्या.

अन्न खाऊ नये, मंदिर बंद, ग्रहणानंतर स्नान करावे,

गर्भवती महिलांनी बाहेर पडू नये,

पूर्वी घरामध्ये पुरेसा प्रकाश नव्हता. घरांना खिडक्या फारशा नव्हत्या.स्वच्छतेचा अभाव कारण

स्वच्छतेची साधने नव्हती. त्यामुळे अन्न खराब व्हायचे. लोकांनी सुरक्षिततेसाठी नियम बनवले हे नियम म्हणजे मोठीअंधश्रद्धा होती.

याच पुढे धार्मिक प्रथा परंपरा म्हणून रूढ झाल्या.

ग्रहणामुळे गर्भाला इजा होते असा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही.

तसेच ग्रहणाच्या काळात गर्भवती महिलेने अन्नपदार्थ पाणी घेतल्याने कोणताही विपरीत परिणाम गर्भावर होत नाही.

सुरी कात्री धारदार वस्तू या नेहमीच काळजीपूर्वक हाताळायचे असतात परंतु गर्भवती महिलेने या वस्तू हाताळल्यास गर्भावर कोणताही वाईट परिणाम होत नाही यास कोणताही वैज्ञानिक आधार नाही.

ग्रहण ही घटना केवळ सावलीची आहे.

उलट या परिस्थितीत गर्भवती महिलेवर भीतीमुळे ताण निर्माण होतो. तोच खरा धोका असतो

विज्ञानाची क्रांती

ग्रहणांनी विज्ञानाला दिशा दिली, पृथ्वी गोल आहे हे सिद्ध झाले, वातावरणाचा अभ्यास झाला, प्रकाशाचे गुणधर्म समजले, आज संगणक हजारो वर्षांपूर्वीची ग्रहणे सांगतात.

विद्यार्थ्यांसाठी संधी



सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

ग्रहण म्हणजे जिवंत प्रयोगशाळा. निरीक्षण करा, वेळ नोंदवा, फोटो काढा, कदाचित एखादा वैज्ञानिक अशाच क्षणातून जन्म घेतो.

सामाजिक बोध

ग्रहण शिकवते – अंधार कायमचा नसतो, ज्ञानाने भीती संपते, श्रद्धा संस्कृती देते, विज्ञान सत्य देते, दोन्हींचा समतोल समाज घडवतो, सावलीचा अर्थ, चंद्र काही वेळ झाकोळतो, पण पुन्हा उजळतो, जीवनातही संकटे येतात, पण ती कायम राहत नाहीत,

ग्रहण सांगते – अंधश्रद्धेपेक्षा विज्ञान श्रेष्ठ. भीतीपेक्षा जिज्ञासा श्रेष्ठ, ज्ञान म्हणजे प्रकाश.

३ मार्च २०२६ रोजी आकाशात घडणारे हे दृश्य आपल्याला आठवण करून देईल

विश्व विशाल आहे. मानव लहान आहे.

पण त्याची जिज्ञासा अमर आहे अंधश्रद्धेपेक्षा विज्ञान श्रेष्ठ. भीतीपेक्षा जिज्ञासा श्रेष्ठ. ज्ञान म्हणजे प्रकाश. प्रत्येक ग्रहणानंतर पौर्णिमा येते.

म्हणून जीवनात सावल्या आल्या तरी विश्वास ठेवा.

कारण प्रकाश परत येणारच, ग्रहण म्हणजे अंधाराचा विजय नाही. ती प्रकाशाची परीक्षा आहे.

पृथ्वी काही क्षण चंद्र झाकोळते.

पण चंद्र पुन्हा उजळतो. मानव जीवनही तसेच.

संकटे येतात. अपयश येते. भीती येते.

पण ज्ञानाचा दीप पेटला की अंधार निघून जातो.

''उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः'' प्रयत्नानेच यश मिळते.

प्राचीन मानवाने भीतीतून कथा निर्माण केल्या; त्या कथांनी संस्कृती घडवली. परंतु काळ बदलला आणि विज्ञानाने सत्याचे दार उघडले.

म्हणूनच ग्रहणाकडे पाहताना आकाशातील त्या सावलीपेक्षा मनातील अज्ञानाची सावली दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण खरे ग्रहण सूर्याला लागत नाही ते विचारांना लागते. आणि ज्ञानाचा प्रकाश पेटवला की प्रत्येक ग्रहण एक सुंदर अनुभव बनते.

**

# अनुभूती स्त्रियांच्या भावभावनांचा आरसा

ज्योतिर्मय साहित्य




१८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आलेल्या अर्चना ठाकरे मोरे यांचा अनुभूती हा कथासंग्रह समकालीन मराठी साहित्यात आपली वेगळी मोहोर उमटवणारा ठरला आहे. कथानक आणि विषय अनुभूती या नावाप्रमाणेच या संग्रहातील प्रत्येक कथा ही लेखिकेच्या संवेदनशील मनाला आलेल्या अनुभवांची शिदोरी आहे. कौटुंबिक नातेसंबंध, समाजातील विसंगती आणि मानवी मनाचे गुंतागुंतीचे पदर लेखिकेने अतिशय सोप्या पण प्रवाही भाषेत उलगडले आहेत. प्रत्येक स्त्रीने वाचावा असा हा कथासंग्रह आहे समाजातील हतबल झालेल्या स्त्रियांना प्रेरणा देणारा हा संग्रह नक्कीच आहे. समाजातील अनिस्तर रुढींना फाटा देत नवीन विचारांना स्वीकारले पाहिजे ही लेखिकेची मानसिकता त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते. लेखिकेच्या स्वभोवती असलेल्या असहाय्य, हतबल स्त्रियांबद्दल लेखिकेला असलेली कळकळ या कथांमधून सिद्ध होते. त्यांच्या मागे भक्कमपणे उभे राहण्याची इच्छा त्यांच्या लेखणीतून स्पष्ट होते.

पात्रचित्रण: लेखिकेने कथेतील पात्रे आपल्या अवतीभवतीच्या जगतातून उचलली आहेत, त्यामुळे वाचक कथेशी लगेच एकरूप होतो, आणि शेवटपर्यंत कथेत गुंतून राहतो. विशेषतः स्त्री मनाच्या विविध अवस्थांचे चित्रण यात अतिशय प्रभावीपणे आले आहे.

पुस्तक परिचय
राहुल खरात,
आटपाडी, पुणे

सामाजिक भान : एक शिक्षिका म्हणून कार्यरत असताना समाजाचे जे सूक्ष्म निरीक्षण त्यांनी केले, त्याचे प्रतिबिंब या कथांमध्ये उमटले आहे. केवळ मनोरंजन न करता अंतर्मुख करायला लावणे, हे या कथासंग्रहाचे यश आहे.

लेखिका परिचय : एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

सौ. अर्चना ठाकरे मोरे यांचा जन्म १५ जून १९७६ रोजी झाला. त्यांनी राज्यशास्त्र विषयात एम.ए. (प्रथम श्रेणी) आणि डी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. गेल्या २८ वर्षांपासून (१९९६ पासून) त्या मूर्तिजापूर येथील न.प. प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत.

त्यांच्या कारकीर्दीतील ठळक बाबी:

उत्कृष्ट शिक्षिका गौरव: २०१३ मध्ये त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन नगर परिषद, मूर्तिजापूर तर्फे त्यांना गौरविण्यात आले.

सामाजिक योगदान: त्या श्रीनाथ बहुद्देशीय संस्था या संस्थेच्या सचिव म्हणून सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. तसेच विश्व मांगल्य सभेच्या त्या सक्रिय सभासद आहेत.

साहित्यिक ओढ : केवळ कथालेखनच नव्हे, तर कादंबरी लेखन, साहित्य वाचन आणि पर्यटन या विषयांतही त्यांना विशेष रुची आहे.

थोडक्यात सांगायचे तर: अनुभूती हा कथासंग्रह वाचकाला स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांकडे पुन्हा वळून पाहायला लावतो. अर्चना ठाकरे मोरे यांच्या लेखणीत साधेपणा आणि प्रामाणिकपणा आहे, जो आजच्या काळात दुर्मिळ होत चालला आहे. त्यांच्या भविष्यात येऊ घातलेल्या सर्व साहित्य कृतीसाठी भरभरून शुभेच्छा.

पुस्तक परिचय व परीक्षण:
अनुभूती – स्त्रियांच्या भावभावनांचा आरसा
लेखिका: अर्चना ठाकरे मोरे
प्रकाशन : ग्रॅव्हिटी पब्लिकेशन,
मूल्य: ₹२००/-

***

# चालते बोलते सुविचारक...

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याला अनेक ठिकाणी सुविचार लिहिलेले वाचावयास मिळतात. शाळा महाविद्यालयात, नगरपालिका, महानगरपालिका, पोलिस ठाण्यात, वगैरे ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे सुविचार पहायला मिळतात. हे सर्व सुविचार किती परिणाम करतात ते माहिती नाही. ''झाडू संतांचे मार्ग'' या सुविचाराचा पंढरीत सध्या पहावयास मिळतो आहे. खरं तर सुविचार जीवनात खूप उपयुक्त असतात.

परवा घराकडे जाताना एक ऊसाचा ट्रॅक्टर ऊस भरून चालला होता. नेहमी प्रमाणे त्याला साईड दिली. तर त्याच्यावर खूप चांगला सुविचार किंवा विचारप्रधान वाक्य वाचायला मिळाले. पटकन चालत्या गाडीवरुन मोबाईल मध्ये त्याचा फोटो टिपला. बर्याच ट्रॅक्टर, ट्रक, वरती अनेक वाक्ये बोधवाक्ये वाटावीत अशी लिहीलेली असतात.अनेकांना अशी वाक्ये वाचावयास मिळाली असतीलच. या ही पेक्षा वेगळीही असू शकतात.

म्हणून मेरा भारत महान, भीऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. बुरी




नजर वाले तेरा मुँह काला।, माझ्या लाडाचं पाखरु, थांब लक्ष्मी कुंकू लावते, ही नेहमीची वाक्ये ! ट्रॅक्स क्रूझर वर तर मजेशीर वाक्ये असतात. एका ट्रॅक्सवर स्त्री चे चित्र होते आणि पुढे लिहिले होते नगं दाजी कावत्यात !!... पण त्या एका ट्रॅक्टरवर व एका मालट्रक वर लिहिलेली वाक्ये खरच भारी होती. एका ट्रक वर लिहिले होते, ''आईबाप आणि शरीराला जपा बाकी कोण कामाला येणार नाही लक्षात ठेवा''.तर ऊसाच्या ट्रॅक्टर वर लिहिले होते, ''डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या जेंव्हा बाप म्हणाला, ''कसलं टेन्शन घ्यायचं नाही मी आहे ना....!!'' आणि खाली मोठ्या अक्षरात लिहिले होते ''देवमाणूस'' या वाक्याने माझ्या ही डोळ्यात अश्रू जमा झाले. मनात विचार आला माझ्या चेहऱ्यावर कधी टेन्शनच दिसले नाही का कुणाला?

हल्लीची मुले ही कधी फार टेंस मध्ये दिसत नाहीत त्यामुळे बापांना असे म्हणायला सुचत नसेल. असे विचार मनात येऊन जातात याचाच अर्थ ही वाक्ये विचारप्रधान आहेत.बुरी नजर वाले तेरा मुँह काला....हे ही असेच वाक्य!!त्या ट्रक वाल्याशी वाचणार्याची कसलाही भांडणतंटा नाही. मग वाचकांनी ते का वाचावे? लिहिले म्हणून वाचले पण ज्यांची नजर वाईट आहे त्यांना ते लागू पडेल.ज्यांची नजर चांगली आहे त्यांनी मनाला लावून घेऊ नये इतकेच!!पण त्यातूनही आपली नजर कुणाला लागू नये ऐवढ पथ्य पाळायला शिकविणारे हे बोधवाक्य!!!

चालते बोलते उपदेश, सुविचार, संदेश हे त्या सर्व प्रदर्शित करणाऱ्या लोकांचे अनुभव असावेत, उगाच काहीतरी ते सुचवू पाहत नसावेत, असे वाटते.पण या अशा उपदेशपर सूचनांचे स्वागत आहे, ते उपदेश लादले जात नाही, तर ज्याच्या त्याने स्विकार करण्याच्या मानसिकतेचा भाग आहे.कोण जाणे, याचा फायदा जीवनात होणारा असेल किंवा पूर्वी अनुभवास आला असेल? असे उपदेश, सुविचार, सूचना प्रदर्शित करणाऱ्यांना धन्यवाद तर द्यावेच लागतीलच.आज कालच्या काळात सर्वांना या विचाराने काही तरी विचार मिळतील व अनुभव येतील. लोकां सांगे ब्रह्म ज्ञान स्वतः कोरडे पाषाण असे याच्या माध्यमातून पाहायला मिळू ननये बस्स !!



दत्तात्रय तरलगट्टी सर
मुक्त पत्रकार, पंढरपूर.

# रंग सुख दुःखाचे.....

ज्योतिर्मय साहित्य

माणसाच्या जीवनात विविध रंग भरलेले आहेत, म्हणूनच, आपले जीवन सुखकर होते. विधात्याने अत्यंत तन्मयतेने विचार करुनच या जगातील माणसाच्या जीवनात अनेकविध नवरंग भरलेले आहेत. त्या रंगांच्या आधारेच तर माणूस आपले जीवन जगत असतो. सुखदुःखांच्या रंगानेच तर माणसाला जीवनाचा अर्थ कळत असतो. त्यामुळेच तर जीवनाची चव घेत, आनंद घेत तो जगत असतो. पण, या एकविसाव्या शतकातील माणसे मात्र, ते पुर्णतः विसरलेली आहेत. निसर्गनियमांचे पालन न करता तसेच, मनमानेल तसे, बेभानपणे, अवैधपणे जगी वागत आहेत. वाटेल तसे रस्त्यावरुन बेभानपणे कार, ट्रक वाहन चालवत वाटेल तसे वर्तन करीत आहेत. तसेच, मोठ्या प्रमाणात जंगलकटाईही करीत आहेत. याचा परिणाम निसर्गचक्रावरही झाला आहे. त्यामुळे,

निसर्गाचे रंगही माणसाने बदलायला सुरुवात केली आहे. त्यामुळे, कधीही अवकाळी जोराचा पाऊस पडत आहे. गारपीट होते आहे. मध्येच उष्णता मध्येच थंडी पडत आहे. हा माणसांच्या वर्तनात आणि स्वभावात झालेल्या बदलत्या रंगांचा परिणाम आहे. म्हणूनच, तर जगात काही माणसांमुळे ही सध्याची परिस्थिती सर्वत्र ओढवलेली आहे.



तसेच, अशा माणसांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. अशा माणसांच्या अशा वृत्तीला पुर्णतः आळा हा बसलाच पाहिजे. आजची बेताल वागणाऱ्या आणि बेभान बोलणाऱ्या आणि तसंच चालणाऱ्या माणसांमुळे या विविध रंगांच्या सणाच्या आनंदाचे रंग बदलू लागले आहेत. याचा थोडा देखील विचार आणि विवेक या माणसांजवळ आज राहिलेला नाही. बहुरंगी जीवन छानपणे आनंदाने जगण्यासाठी आणि त्याचा उत्तम आस्वाद घेता येण्यासाठी सृष्टीच्या निसर्ग नियमानुसार आणि आपल्या पूर्वापार चालत आलेल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीनुसार आपण सर्वजण चांगले वागू या! आणि आपल्या सणांचा व या छान जीवनाचा आनंद सदैव लुटू या. आपली भारतीय संस्कृती म्हणजेच हिंदूसंस्कृती जगात महान आहे. आपल्या देशातील प्रत्येक सणाला विशिष्ट महत्व व विशिष्ट अर्थ आहे. त्यामुळेच, सर्वांचे जीवन सदाबहार रंगीन होते. म्हणूनच, परदेशातील शेकडो पर्यटक अशा सर्व सर्व सणांचा आनंद लुटण्यासाठी, आनंद घेण्यासाठी भारतात येतात. याबाबतीत आपला भारतदेश जगात सर्वश्रेष्ठ आहे. याचा आपल्याला अभिमान हवा. याचा गर्व असलाच पाहिजे. गर्वसे कहो! हम हिंदू है! जय हिंद! जय महाराष्ट्र! रंगपंचमी बाबतची एक स्वरचित कविता यासोबत सादर केली आहे.

''रंग रंगपंचमीचे, रंग माणसांचे''

होळीच्या रंगपंचमीचे असतात बहू रंग
निसर्गनिर्मित विविध बारा मनमोही रंग
जे रंग भूषवितात माणसाचे सकल अंग
परि,माणूस दाखवितो निज वेगळेच रंग
दाखवी स्वभावाचे वेगळेच रंग अन् ढंग
सोडून दे माणसा, तव दूष्कर्मांचे रे रंग!
राग,लोभ,मोह,मद,मत्सर, दूर कर या रंगांना
जवळ कर तू प्रेम,ममता,जिव्हाळा या रंगांना
जाण!तू हा होळीपौर्णिमा व रंगपंचमीचा अर्थ
तरच,येईल माणसा!जीवनासी अर्थपुर्ण अर्थ.

होळीच्या व धुलिवंदनाच्या सर्वांना खूप हार्दिक शुभेच्छा!



लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१